cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–४२ गुरूवार दि.२३ मे २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### रईसी यांचा मृत्यू गूढ वाढवणारा..

इराणचे राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रईसी, परराष्ट्र मंत्री होसेनी अमीर अब्दुल्लाहियान यांच्यासह ८ जणांना घेऊन जाणाऱ्या अपघातग्रस्त हेलिकॉप्टरचा शोध अखेर बचाव पथकाला लागला. अझरबैजानच्या डोंगराळ भागातील एका खोल दरीत हे अपघातग्रस्त हेलिकॉप्टर बचाव पथकाला सापडले खरे पण इब्राहिम रईसी यांच्यासह हेलिकॉप्टरमधील सर्वांचाच मृत्यू झाला. इराणने अधिकृतरीत्या त्याची पुष्टीही केली आहे.

### अग्रवाल कुटुंबाचे अंडरवर्ल्ड कनेक्शन

पुणे –कार अपघातात प्रकरणी पोलिसांनी चालक मुलाचे वडील विशाल अग्रवालला अटक केली असून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. अग्रवाल कुटुंबाचे छोटा राजनशी संबंध असल्याचे उघड झाले आहे. कार अपघातातील मुलाचे आजोबा सुरेंद्र कुमार अग्रवाल यांचे अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनशी संबंध असल्याची माहिती उघड झाली आहे. सुरेंद्र कुमार अग्रवाल यांच्याविरोधात मुंबई सत्र न्यायालयात खटला सुरू आहे. संपत्तीच्या वादातून भावाविरुद्धच वाद सुरू आहे. यात सुरेंद्र कुमार अग्रवाल यांनी थेट छोटा राजनकडून मदत घेतल्याचा आरोप आहे. विशाल अग्रवाल यांच्याविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

# महाराष्ट्राचे पैसे काश्मीरच्या शेतकऱ्यांच्या खात्यात

## २ वर्षांपासून घोळ, आ. बच्चू कडू आवाज उठविणार

**पुणे । पतिनिधी**

**पीएम किसान योजनेचे लाभार्थी अमरावतीमधील शहापूरचे आणि आर्थिक मदतीचे पैसे जम्मू–काश्मीरमधील शहापूरमधील शेतकऱ्यांच्या खात्यात गेले आहे. हा घोळ अमरावती जिल्ह्यातील सरकारी अधिकाऱ्यांच्या भोंगळ कारभारामुळे झाला आहे. अमरावती जिल्ह्यातील शहापूर गावातील ८२ शेतकऱ्यांचे दोन वर्षांचे अनुदान चक्क जम्मू काश्मीरच्या शहापूर गावातील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाल्याचा हा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणाची काही शेतकऱ्यांनी आमदार बच्चू कडू यांच्याकडे तक्रार केली आहे.**

शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून पीएम किसान योजना राबवली जाते. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वेळोवेळी शेतीच्या भांडवलासाठी आर्थिक मदत दिली जाते. परंतु सरकारी अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे लाभार्थी शेतकरी आर्थिक मदतीपासून वंचित राहत आहेत. याचाच प्रत्यय अमरावती जिल्ह्यात पाहायला मिळाला आहे. पीएम किसान म्हणजेच पंतप्रधान किसान सन्मान योजनेअंतर्गत वर्षाला १२ हजार रुपये अनुदान हे शेतकऱ्यांना दिले जाते. मात्र, गेल्या २ वर्षांपासून अमरावती ◀◀ पान २ वर




### राज्याचा पैसा दुसऱ्या राज्यात जातोच कसा– आ.कडू

**» प्रहारक संघटनेचे नेते आमदार बच्चू कडू यांनी भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्या घरासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. यावरून ते सध्या चर्चेत असतानाच आता थेट त्यांनी पीएम किसान योजनेबाबत प्रश्न चिन्ह उपस्थित केला आहे. कडू यांनी यावेळी पीएम किसान योजनेत घोटाळ्याची शक्यता असून, राज्यातील शेतकऱ्यांना मिळणारा पीएम किसान योजनेचा पैसा दुसऱ्या राज्यात जातोच कसा, असा सवाल उपस्थित केला आहे. यामुळे राज्यात सध्या उलट सुटल चर्चा रंगल्या आहेत. दरम्यान, याबाबतचा प्रश्न आपण विधानसभेत उपस्थित करू, असेही सुद्धा बच्चू कडू यांनी यावेळी म्हटले आहे.**

## डाळ महागली तुटवडा की साठेबाजी?

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**महागाई प्रत्येक गोष्टीत अस्मानाला जाऊन भिडत असून थांबण्याचे किंबहुना कमी होण्याचे नावही दिसून येत नाही. महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असून, आता डाळींच्या दरानेदेखील उच्चांक गाठला आहे. बाजारपेठेत तूर डाळ व हरभरा डाळींचे दर महागले आहेत.**

एकीकडे बाजारात डाळींचा तुटवडा नाही असे म्हटले जात आहे पण 'सिस्टीमच्या' दुर्लक्षामुळे भाववाढ होत असल्याचे म्हटले जात आहे. मागील हंगामात तूर डाळीच्या उत्पादनाला फटका बसला पण सध्या कारवाई थांबल्याने बडे साठेबाज हात धुऊन घेत असल्याचा आरोप व्यापारी करीत आहेत. गुजरात राज्यातील व्यापाऱ्यांनी तूर डाळ जास्त प्रमाणात खरेदी केल्याचे व्यापारी सांगत आहेत. बाजारात तुटवडा नाही; पण साठेबाजीमुळे भाव वाढत असल्याचे व्यापाऱ्यांचे मत आहे. व्यापाऱ्यांनी सांगितले की, तुटवड्यामुळे ७ वर्षांपूर्वी तूर डाळीला किलोमागे २०० रुपये मोजावे लागले होते. आता तीच परिस्थिती आहे. २०१२ मध्येही तूर डाळ २०० रुपयांपर्यंत गेली होती.

# बीड जिल्ह्याला लाचखोरीने ग्रासले!

## माजलगावात कार्यकारी अभियंता तर बीडमध्ये नगर रचनाकार एसीबीच्या जाळ्यात

**बीड । प्रतिनिधी**

**आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हरिभाऊ खाडे यास एक कोटीची लाच आपल्या सहकाऱ्यासह घेतल्याचे प्रकरण ताजे असतानाच बीडमध्ये १५ हजाराची लाच घेतल्यामुळे नगर रचनाकारासह दोघे एसीबीच्या जाळ्यात अडकले आहेत तर माजलगावात एका कार्यकारी अभियंत्यास २८ हजाराची लाच घेताना रंगेहाथ पडकले. ही कारवाई एसीबीकडून बुधवारी करण्यात आली.**

येळंबघाट परिसरातील गट क्र. ५८० अ (१) मधील २०.५० आर क्षेत्राचा अकृषीक परवाना काढण्यासाठी ऑनलाईन अर्ज बीपीएमएस पोर्टलवर तक्रारदाराने खासगी व्यक्ती निलेश पवार यांच्या मार्फत दाखल केला होता. हा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी कार्यालय, बीड यांच्याकडून पुढील कार्यवाहीसाठी बीड येथील नगर रचना कार्यालय येथे आला होते. या कार्यालयात प्रशांत पवार यांच्याकडष नगर रचनाकार यांचा अतिरिक्त पदभार असून त्यानंतर पवार याने सहाय्यक नगर रचनाकार प्रशांत डोंगरे यांच्यासाठी तक्रारदार यांच्याकडे दि. २६ मार्च रोजी ३० हजाराची मागणी केली. तडजोडीअंती १५ हजार देण्याचे ठरले. त्यावर तक्रारदार याने दि. २ एप्रिल रोजी पंचासमक्ष लाचेची खात्री करण्यात आली. त्यानंतर दि. ४ एप्रिल रोजी डोंगरे याने देखील लाच मागितल्याचे सिध्द झाले. त्यानंतर तडजोडीअंती १५ हजाराची लाच शेख नेहाल याच्याकडे देण्यास सांगितली. या प्रकरणी एसीबीच्या पथकाने निलेश पवार आणि नेहाल शेख यांना ताब्यात घेतले असून डोंगरे मात्र फरार आहे. ही कारवाई बुधवारी केली. बीड शहर पोलिस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.



**लाचखोर राजेश आनंदराव सलगरकर**

माजलगाव तालुक्यात दुसरी कारवाई करण्यात आली असून पाटबंधारे विभागातील कार्यकारी अभियंता राजेश आनंदराव सलगरकर यास २८ हजाराची लाच घेताना बुधवारी पकडले आहे.

मौजे चिंचोटी येथील ७ शेतकऱ्यांनी बुडीत क्षेत्रातील गाळ काढून शेतात टाकण्यासाठी परवानगी मिळावी, म्हणून कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग यांच्याकडे अर्ज केला होता. शेतकऱ्यांना परवानगी देण्यासाठी प्रत्येकी ५ हजाराची मागणी केली. तडजोडीनंतर प्रत्येकी ४ हजार या प्रमाणे २८ हजार देण्याचे ठरले. त्यानंतर शेतकऱ्यांधील एक तक्रारदार आणि एक साक्षीदार यांनी एसीबीकडे तक्रार दिली. यानंतर एसीबीच्या पथकाने सापळा रचून सलगरकर यांना २८ हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडले. ◀◀ पान २ वर

## अखेर अल्पवयीन आरोपीचा जामीन रद्द

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपीचा जामीन रद्द करण्यात आला असून, त्याची आता बालसुधारगृहात रवानगी करण्यात येणार आहे. दारू पिऊन नशेमध्ये भरधाव वेगाने गाडी चालवत या अल्पवयीन आरोपीने दोघांचा जीव घेतला होता. अटक झाल्यानंतर त्याला १५ तासांमध्येच जामीन मंजूर करण्यात आला होता. आता बाल न्याय मंडळाने त्याचा जामीन रद्द केला असून अल्पवयीन आरोपी हा सज्ञान आहे की नाही हे पोलिस ठरवतील असेही बाल न्याय मंडळाने म्हटले आहे.

बुधवारी सकाळी पुणे पोलिसांनी अल्पवयीन आरोपीला कोर्टात हजर केले. त्यावेळी युक्तीवाद करत असताना पोलिसांनी मुलगा दारु प्यायला होता हे न्यायालयाला पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी अल्पवयीन मुलाने कोझी किचन हॉटेलमध्ये भरलेले ४८ हजार रुपयांचे बीलही कोर्टासमोर सादर केले. तर तिकडे बचावपक्षाच्या वकिलांनी मुलगा अल्पवयीन असल्याचा युक्तीवाद केला. दोन्ही बाजूचे युक्तीवाद झाल्यानंतर न्यायलयाने आदेश दिला. हा मुलगा अल्पवयीन असल्याचे आरोपीच्या वतीने युक्तीवाद ◀◀ पान २ वर

## दारू सोडण्याच्या औषधाने दोघांचा मृत्यू

चंद्रपुर । प्रतिनिधी

जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यातील दोन तरुणांचा दारु सोडण्याचा औषध घेतल्याने दोन जणांचा मृत्यू झाला आहे. तर दोन जण गंभीर आहेत. हे चारही शेतकरी वर्धा जिल्ह्यातील गुळगाव या ठिकाणी आहे. या शेतकऱ्यांनी दारु सोडवण्याचा दावा करणाऱ्या महाराजांकडे औषध घेतले होते. हे औषध घेतल्यानंतर दोघांचा मृत्यू झाला आहे. सध्या पोलीस या घटनेचा तपास करत आहेत. यात सहयोग सदाशिव जीवतोडे, प्रतिक घनश्याम दडमल यांचा मृत्यू झाला तर सदाशिव पुंजाराम जीवतोडे, सोमेश्वर उध्दव वाकडे यांची प्रकृती चिंताजनक आहे.

## हेमंत सोरेन यांना सर्वोच्च धक्का

### निवडणुकीसाठी जामीन देण्यास न्यायालयाने दिला नकार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी जामीन अर्ज दाखल करणारे झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. सर्वोच्च न्यायालयाने सोरेन यांना अंतरिम जामीन देण्यास नकार दिला आहे. हेमंत सोरेन सध्या जमीन घोटाळ्याशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात तुरुंगात आहेत. निवडणुकीत पक्ष आणि उमेदवाराच्या प्रचारासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयात अंतरिम जामिनासाठी या३चिका



दाखल केली होती. त्यावर बुधवारी माननीय न्यायालयाने सोरेन यांना ◀◀ पान २ वर

## शाहरुख खानची प्रकृती बिघडली

मुंबई–आयपीएलच्या पहिल्या क्वालिफाय सामन्यात आपल्या टीमला सपोर्ट करण्यासाठी शाहरुख खान अहमदाबादला पोहोचला होता. या दरम्यान आता अशी बातमी समोर आली आहे की त्याला उष्माघाताचा त्राल झाला आहे. ज्यामुळे त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याची प्रकृती आता स्थिर आहे.

# निवडणूक आयोगाच्या गलथानपणाचा मतदारांना फटका

## जितेंद्र आव्हाड यांचे टीकास्त्र

**मुंबई । पतिनिधी**

**महाराष्ट्रामध्ये पाचव्या टप्प्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या मतदार यादी मधून अनेकांचे नाव गहाळ झाली होती तर निवडणूक आयोगाच्या गलथानकारभारामुळे अनेक मतदारांना आपला मतदानाचा अधिकार बजावता आला नाही. निवडणूक विभागाकडून करण्यात आलेल्या चुकीमुळे मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागले आहे, अशी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी टीका केली. बुधवारी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत**



**ते बोलत होते.**

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, आसाममध्ये ७८ टक्के, बंगालमध्ये ८१ टक्के मतदान झाले. पण महाराष्ट्रात इतके कमी मतदान करताना लोकांना काय झाले ते लक्षातच आलेले नाही. मतदान केंद्रांवर पाणी नव्हते, पंखे नव्हते, काही ठिकाणी मशीन बंद पडल्या. मतदारांची गैरसोय कशी होईल हे पाहिले गेले. कळवा – मुंब्रा येथील आमदार म्हणून मी खुली तक्रार करतो आहे की हे निवडणूक आयोगाचे सपशेल अपयश आहे अशी टीकाही त्यांनी केली. पुढे बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले की, ◀◀ पान २ वर

## गहिनीनाथ गडाचे मठाधिपती विठ्ठल महाराजांच्या गाडीचा अपघात

### महंत विठ्ठल महाराज सुखरूप

**शिरूर । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील चिंचोली येथील श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाचे मठाधिपती ह.भ.प.विठ्ठल महाराज यांच्या गाडीचा आज बुधवार दि.२२ मे रोजी दुपारीच्या पाथर्डी जवळील घाटात एका वळणावर गहिनाथ गडावरून पाथर्डीच्या दिशेने जात असताना भीषण अपघात झाला आहे.यामध्ये महाराजांच्या पायाला दुखापत झाली असून ड्रायव्हर जखमी झाला आहे. सुदैवाने महाराज सुखरूप असून त्यांच्या पायाला दुखापत झाली असल्याने प्रथम उपचारासाठी अहमदनगर येथील साईदीप या खाजगी रुग्णालयात नेले असून त्यांना पुढील उपचारासाठी पुणे येथील त्यांच्या नेहमीच्या ◀◀ पान २ वर





## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२२ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : २४.५० क्विंटल | २,१०१ | २,९९० | २,५२० |
| ज्वारी/हायब्रिड : ११२.५० क्विंटल | १,२५० | २,८३० | २,४०२ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ५.५० क्विंटल | १०,७९० | ११,४५१ | ११,१८० |
| उडीद : २.५० क्विंटल | ७,४०० | ७,४०० | ७,४०० |
| बाजरी: ८.०० क्विंटल | १,९०० | २,७२० | २,४२८ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ६१.०० क्विंटल | ४,४८० | ४,५६० | ४,५४० |
| हरभरा: १.०० क्विंटल | २९.०० | ५,८५० | ६,००० |

# मोदी सत्तेत येतील पण ४०० पार अशक्य

## प्रशांत किशोर यांचे भाकीत; सत्तेत येताच ही कामे हाती घेतील

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**भाजपने यंदाच्या लोकसभा निवडणुकीत दिलेला ४०० पारचा नारा खरा ठरणे कठीण असल्या निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी म्हटले आहे. पण असे असले तरीदेखील देशात मोदींचेच सरकार स्थापन होईल, असे भाकीत प्रशांत किशोर यांनी केले आहे. नरेंद्र मोदी हे देशात तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करणार असून भाजपला गेल्या वेळीप्रमाणे ३०३ च्या जवळपास जागा मिळतील असा दावा निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी एका मुलाखतीत केला आहे.**

राजकीय विश्लेषक प्रशांत किशोर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळात पेट्रोलियम उत्पादने





जीएसटीच्या कक्षेत आणली जाऊ शकतात. राज्यांच्या आर्थिक स्वायत्ततेला आळा बसू शकतो. मुलाखतीत प्रशांत किशोर यांनी मोदी सरकारच्या भ्रष्टाचारविरोधी कथनात संरचनात्मक आणि कार्यात्मक बदलांची भविष्यवाणी देखील केली आहे. तसेच मोदी ४०० पार जाणार नाहीत, हे सांगून ते म्हणाले, मोदी सत्तेत येतील, मात्र ३०३ च्या आसपास राहील, असा अंदाज प्रशांत किशोर यांनी व्यक्त केला आहे. प्रशांत किशोर म्हणाले, मला वाटतंय की मोदी ३.० सरकार धमाकेदारपणे सुरू होईल. केंद्रात सत्ता आणि संसाधने या दोन्हींचे जास्त केंद्रीकरण करण्याचा प्रयत्न होईल. राज्यांची आर्थिक स्वायत्तता कमी करण्याचाही प्रयत्न केला जाऊ शकतो. २०१४ मध्ये भाजप आणि पंतप्रधान मोदी यांच्या निवडणूक प्रचाराचं व्यवस्थापन करणारे प्रशांत किशोर म्हणाले की, पंतप्रधानांविरुद्ध कोणताही मोठा राग नाही आणि भाजप सुमारे ३०३ जागा जिंकेल, असे ते म्हणाले.

### पेट्रोल जीएसटीच्या कक्षेत आणल्यास काय होईल?

पेट्रोलियम पदार्थांना जीएसटीच्या कक्षेत आणण्याची उद्योगधंद्यांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. देशातील राज्य या मागणीच्या विरोधात आहेत, कारण यामुळे राज्यांच्या महसुलाचे मोठे नुकसान होणार आहे, असेही ते म्हणाले. उदाहरणार्थ, पेट्रोल जीएसटीच्या कक्षेत आणल्यास राज्यांना कर तोटा होईल आणि राज्यांना त्यांचा हिस्सा मिळविण्यासाठी केंद्रावर अधिक अवलंबून राहावे लागेल. सध्या अंतर्गत सर्वोच्च कर स्लॅब २८ टक्के आहे. पेट्रोल आणि डिझेल सारख्या इंधनांवर १०० टक्क्यांपेक्षा जास्त कर लागतो.

### महाराष्ट्रात बाबत काय म्हणाले?

विरोधी पक्षाला असे वाटतय की ते महाराष्ट्रात २०–२५ जागा जिंकतील. विरोधी पक्षाने २५ जागा जिंकल्या, तरी त्यामुळे भाजपाच काही विशेष नुकसान होणार नाही. वर्तमान स्थितीत, महाराष्ट्रात भाजपाकडे ४८ पैकी २३ च खासदार आहेत. अशावेळी महाराष्ट्रात मविआने जास्त जागा जिंकल्या तरी त्यामुळे भाजपाला विशेष नुकसान होणार नाही, असे ते म्हणाले. त्यामुळे महाराष्ट्रात मविआच्या २५ जागा येतील, असे दिसते.

### पेट्रोल–डिझेल जीएसटीच्या कक्षेत आणता येईल

राजकीय रणनीतीकार किशोर म्हणाले की, राज्यांकडे सध्या महसुलाचे तीन प्रमुख स्त्रोत आहेत – पेट्रोलियम, दारू आणि जमीन. ते म्हणाले की, पेट्रोलियम जीएसटीच्या कक्षेत आणल्यास मला आश्चर्य वाटणार नाही, सध्या पेट्रोल, डिझेल, एटीएफ आणि नैसर्गिक वायू या गोष्टी जीएसटीच्या कक्षेबाहेर आहेत. दरम्यान, सध्या अजूनही व्हॅट, केंद्रीय विक्री कर आणि केंद्रीय उत्पादन शुल्कावर एक्साइज ड्युटी लागते.

cmyk

## अग्रलेख

# रईसी यांचा मृत्यू गूढ वाढवणारा...

इराणचे राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रईसी, परराष्ट्र मंत्री होसेनी अमीर अब्दुल्लाहियान यांच्यासह ८ जणांना घेऊन जाणाऱ्या अपघातग्रस्त हेलिकॉप्टरचा शोध अखेर बचाव पथकाला लागला. अझरबैजानच्या डोंगराळ भागातील एका खोल दरीत हे अपघातग्रस्त हेलिकॉप्टर बचाव पथकाला सापडले खरे पण इब्राहिम रईसी यांच्यासह हेलिकॉप्टरमधील सर्वांचाच मृत्यू झाला. इराणने अधिकृतरीत्या त्याची पुष्टीही केली आहे. मात्र, रईसी यांच्या ताफ्यातील इतर दोन हेलिकॉप्टर दाट धुके असतानाही सुखरूप इराणमध्ये परततात आणि नेमके रईसी ज्या हेलिकॉप्टरमध्ये होते त्याचाच भीषण अपघात होऊन ते चक्काचूर होते या विचित्र योगायोगामुळे या अपघाताबाबत अपघात की घातपात? अशी कुशंका व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे इस्रायल-हमास संघर्षात इराणचे राष्ट्राध्यक्ष असणाऱ्या रईसी यांनी उघडपणे हमासची बाजू घेऊन इस्रायलवर क्षेपणास्त्र डागल्यानंतर इस्रायल-इराणमधला तणाव विकोपाला गेलेला असताना हा अपघात घडला आहे. शिवाय रशिया-युक्रेन युद्धातही इराणने रशियाची बाजू घेत रशियाला क्षेपणास्त्र वाहून नेणाऱ्या ड्रोन्सचा पुरवठा केला होता व अमेरिकेची नाराजी ओढवून घेतली होती. या सगळ्या तणावामागे रईसी यांचे अमेरिकाविरोधी आक्रमक धोरण कारणीभूत होते. रईसी यांच्या कट्टरपंथीय इस्लामी धोरणाने देशांतर्गत असंतोष उफाळून आलेला होता. तो एवढ्या टोकाला पोहोचला होता की, अपघातानंतर रईसी, ज्यांना 'तेहरानचा कसाई' या नावाने ओळखले जाते, जिवंत सापडू नयेत म्हणून इराणमधील संतप्त नागरिकांनी प्रार्थना केल्या होत्या व त्यांच्या मृत्यूची बातमी आल्यावर इराणमध्ये अनेक ठिकाणी जल्लोषही करण्यात आल्याचे वृत्त आहे. ही सगळी परिस्थिती पाहता रईसी यांचा अपघाती मृत्यू हा निव्वळ योगायोग आहे की, घातपात आहे? अशी शंका निश्चितच व्यक्त होते आहे. इराणने अद्याप घातपाताची शक्यता वा शंका व्यक्त केलेली नाही. मात्र, तरीही याबाबत शंकेची सुई इस्रायलकडे वळली आहे.

इस्रायललाही त्याची कल्पना असल्यानेच इस्रायलने 'आम्ही एक टिपूसही ढाळणार नसलो तरी रईसी यांच्या मृत्यूशी आमचा कसलाही संबंध नाही', असा खुलासा केला आहे. विशेष म्हणजे ज्या अझरबैजानच्या डोंगराळ भागात रईसी यांचे हेलिकॉप्टर अपघातग्रस्त झाले तो भाग एकवेळ इस्रायलची गुप्तचर संघटना मोसादचे वर्चस्व असलेला भाग होता. या भागात वास्तव्य करून इराणची हेरगिरी केल्याच्या आरोपावरून इस्रायलच्या चार नागरिकांना पकडून इराणने मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली होती. काही दिवसांपूर्वी इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्र व ड्रोन्सद्वारे मोठा हल्ला केला होता. इस्रायलच्या क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणेमुळे इस्रायलने हा हल्ला निष्प्रभ केला होता. इस्रायलने या हल्ल्यास तेवढेच जोरदार प्रत्युत्तर न देता या हल्ल्याचा बदला घेतला जाईल अशी प्रतिक्रिया दिली होती. या पार्श्वभूमीवर मोसादचे वर्चस्व राहिलेल्या अझरबैजानच्या दुर्गम व घनदाट जंगलाच्या भागातच रईसी यांच्या हेलिकॉप्टरला झालेला अपघात हा आणखी एक योगायोगच! त्यामुळे इस्रायलने बदला पूर्ण केला का? ही शंका उपस्थित होते. त्यातूनच या अपघाताचा ठपका इस्रायलवर ठेवण्यास सुरुवात झाली आहे.

रईसी यांच्या कडवट व कट्टरपंथी विचारांची छाप इराणच्या देशांतर्गत व परराष्ट्र धोरणावरही मोठ्या प्रमाणावर होती. त्यातून इराण हा युद्धखोर देश अशी प्रतिमा निर्माण झाली होती. मात्र, त्याची फारशी चिंता न करता रईसी यांनी इराणला अण्वस्त्रसज्ज देश बनविण्याची योजना रेटून पूर्ण केली होती. एवढ्यावरच न थांबता इतर किमान दोन मुस्लिम राष्ट्रांना अण्वस्त्रसज्ज बनविण्याची रईसी यांची इच्छा होती. यातून इराणने अमेरिका व इतर पाश्चात्त्य देशांची नाराजी ओढवून घेतली होती. इराण जागतिक राजकारणात एकटा पडला होता तरी रईसी आपले आक्रमक परराष्ट्र धोरण बदलायला अजिबात तयार नव्हते. देशांतर्गतही त्यांनी इस्लामच्या नावावर महिलांविरोधी धोरण राबविले होते. हिजाबसक्तीच्या विरोधात महसा अमिनीने आंदोलन पुकारल्यावर इराणच्या नैतिक पोलिसांनी तिला अटक केली व अत्यंत क्रूरपणे मारहाण केली. तिचा त्यातच पोलिस कोठडीत संशयास्पद मृत्यू झाला होता. त्यामुळे इराणमध्ये हिजाबविरोधी आंदोलन चिघळले. हजारो महिला रस्त्यावर उतरल्या. मात्र, रईसी यांनी बळाचा वापर करून हे आंदोलन चिरडून टाकले. रईसी इराणचे अध्यक्ष होण्यापूर्वी प्रमुख न्यायाधीश होते. तेव्हा त्यांनी बलात्कार झाल्याची फिर्याद करणाऱ्या असंख्य मुलींना देहदंडाची शिक्षा ठोठावली. त्यात चौदा वर्षांच्या असंख्य कोवळ्या मुलींचाही समावेश होता. रईसी यांनी आपल्या कारकीर्दीत किमान ४० हजार जणांना फाशीची शिक्षा दिली. या सगळ्यांना फाशी देण्यासाठी जल्लाद कमी पडू लागले तेव्हा अजस्त्र क्रेनवर लटकवून गुन्हेगारांना जाहीर फाशी देण्याची अत्यंत क्रूर पद्धत रईसी यांनी अवलंबिली होती. रईसी यांना 'तेहरानचा जल्लाद' नावाने का ओळखले जाते व त्यांच्या मृत्यूवर इराणमध्ये जल्लोष का होतो? हे समजावून घेण्यासाठी रईसी यांची ही पार्श्वभूमी समजावून घ्यावी लागते. त्यामुळे रईसी व इराणने अमेरिका, इस्रायलसह अनेक देशांचा रोष व शत्रुत्व ओढवून घेतले होते. त्यातूनच गेल्या चार वर्षांत इराणचे सैन्याधिकारी, राजदूत असे अनेक जण संशयास्पदरीत्या मारले गेले आहेत. एकंदर रईसी यांच्या कडवट मुस्लिम धोरणाने इराणअंतर्गत व बाहेरही त्यांच्याबाबत असंतोष खदखदत होता. मात्र, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खोमेनी यांचे पट्टशिष्य असल्याने रईसी यांच्या उर्मटपणाला आवर घालणे कोणासही शक्य होत नव्हते. आता अपघातानंतर या अपघातामागे खोमेनी यांच्या मुलाचाच हात असल्याचीही चर्चा सुरू झाली आहे. खोमेनी यांनी रईसी यांच्या अपघातानंतर दिलेल्या त्रोटक प्रतिक्रियेने व हा अपघातच असल्याचे स्वीकारण्याचे संकेत दिल्याने या चर्चेला बळ मिळाले आहे. रईसींचा अतिकडवटपणा व आक्रमकता खोमेनींसाठीही डोकेदुखी ठरल्याने सत्तासंघर्ष व वर्चस्वाच्या लढाईतून हा अपघात घडवला गेला का? अशी शंका त्यातून व्यक्त होते आहे.

## महाराष्ट्र खो-खो च्या उपसमित्या जाहीर

**गेवराई । प्रतिनिधी**

पुणे येथे १९ मे रोजी संपन्न झालेल्या बैठकीत महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या सर्व उप समित्या व पदाधिकारी सदस्यांची नियुक्ती महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस डॉ.प्रा.चंद्रजीत जाधव यांनी जाहीर केली. बीडचे प्रा. जनार्दन शेळके यांची शासकीय परिषद स्वीकृत सदस्य, श्रीमती वर्षा कछवा संयुक्त चिटणीस, राज्य प्रसिद्धी समिती सदस्यपदी पत्रकार प्रा . राजेंद्र बरकसे, पत्रकार अविशांत कुमकर यांची नियुक्ती करण्यात आली. निवड झालेल्या सर्व सदस्यांचे महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेचे उपाध्यक्ष माजी आ . अमरसिंह पंडित, शारदा स्पोर्टस ॲकॅडमीचे संचालक रणवीर पंडित , एमॅच्युअर खो-खो असोसिएशन,बीड चे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, उपाध्यक्ष रमेश शिंदे, कैलास गवते,सचिव विजय जाहेर, सहसचिव मनोज जोगदंड, नितीन येळवे, कोषाध्यक्ष योगेश सोळसे, बापूसाहेब तारुकर ,विष्णू काकडे, गोकुळ रेंगे, नितीन काकडे, प्रफुल हाटवटे,नितीन पुटवाड, माधव जायगुडे, सुधीर हजारे, तुकाराम करंडे, विष्णू घोंगडे, डॉ . केतन गायकवाड, विजय अपसिंगेकर,प्रा . रवि खरात आदींनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# भीमा नदीत जलसमाधी मिळालेली बोट १७ तासांनी सापडली

## ६ जण बेपत्ताच, मृत्यूची दाट शक्यता

**सोलापूर । प्रतिनिधी**

**सोलापुरातल्या उजनी धरणात बुडालेली बोट सापडली आहे. १७ तासाच्या अथक प्रयत्नानंतर अखेर बोस सापडली आहे. ३५ फूट पाण्यात तळाशी ही बोट सापडल्याची माहिती समोर आली आहे, मात्र बुडालेल्यांना शोधण्यात अद्याप ला यश आलेले नाही. मात्र सहा प्रवासी अद्यापही बेपत्ता आहेत. बेपत्ता सहा प्रवासी दगावल्याची शक्यता आहे.**

मंगळवारी सायंकाळी सहाच्या दरम्यान उजनी जलाशयात जलवाहतूक करणारी बोट पाण्यात बुडाली होती. १७ तासानंतर बोट सापडली आहे. मात्र इतर सहा प्रवासी अजूनही बेपत्ता आहेत. घटनेची माहिती समजताच पोलीस प्रशासन घटनास्थळी पोचले असून स्थानिक बोटींच्या मदतीने शोध सुरु करण्यात आला आहे. या बोटमध्ये असलेला एक जण पोहत बाहेर आल्याने घटना उघडकीस आली आणि त्यानंतर बचावकार्य सुरु झाले.

सोलापूर जिल्ह्यातील कुगाव ते इंदापूर अशी बोट वाहतूक सुरु असताना ही दुर्घटना घडली होती. बोट बुडत असताना बोटीतून प्रवास करणारे पोलीस उपनिरीक्षक राहुल डोंगरेंनी पाण्यात उडी मारली आणि कळाशी गावाचा काठ गाठला. या घटनेची माहिती आमदार दत्तात्रय भरणेंही घेतली असून सध्या शोधमोहीम सुरु आहे. इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे यांनी घटनास्थळी जाऊन आढावा घेतला माढ्याचे खासदार रणजितसिंह निंबाळकर घटनास्थळी दाखल झाले आहेत. निंबाळकर टीम सोबत जलाशयात उतरले आहेत. प्रशासकीय अधिका-यांकडून त्यांनी अगोदर घटनेचा आढावा घेतला. दरम्यान, या दुर्घटनेत बुडालेल्या प्रवाशांची नावे समोर आली आहेत. गोकुळ दत्तात्रय जाधव (वय ३०), कोमल दत्तात्रय जाधव (वय २५) शुभम गोकुळ जाधव (वय दीड वर्ष), माही गोकुळ जाधव (वय ३) (सर्व रा.झरे ता.करमाळा), अनुराग अवघडे (वय ३५) गौरव धनंजय डोंगरे (वय १६ दोघे रा.कुगाव ता.करमाळा) अशी पाण्यात बुडालेल्या सहा जणांची नावे आहेत.

### नेमकं काय घडले?

करमाळा तालुक्यातील कुगाव ते इंदापूर तालुक्यातील कळाशी दरम्यान जलवाहतूक करणारी बोट सायंकाळी सहाच्या दरम्यान सुगाव येथून कळाशीकडे उजनीच्या जलाशयातून जात होती. सायंकाळी अचानक वादळी वारा सुरु झाल्याने कळाशीच्या बाजूला पोहचत असताना बोट पाण्यातच उलटली. या बोटीत करमाळा तालुक्यातील झरे येथील एक दाम्पत्य व त्यांची दोन लहान मुले , कुगाव येथील एक तरुण, एक बोट चालक आणि राहुल डोंगरे नावाचे पोलीस उपनिरीक्षक होते. बोट बुडू लागताच पोलीस अधिकारी डोंगरे यांनी पाण्यात उडी घेऊन पोहत कळाशी गावाचा काठ गाठला व स्थानिकांना बोट बुडाल्याची सूचना दिली. सहा पैकीएकाही प्रवाशाचा शोध लागलेला नाही. दरम्यान इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे हे देखील घटनास्थळी पोचले असून मदतकार्यात सहभागी झाले आहेत.

# सिंगापूरमधील केपी १, केपी २ व्हेरियंटने भारताची चिंता वाढविली

**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**सिंगापूरमधील कोरोनाच्या नव्या लाटेमुळे जगभरातील देशांची चिंता वाढली आहे. सिंगापूरमध्ये आढळून आलेला कोरोनाचे नवा प्रकार भारतातही आढळून आला आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. भारतात कोरोना प्रकार केपी १ चे ३४ आणि केपी २ चे २९० प्रकरणे नोंदवली गेली आहेत, असे इंडियन सार्स कोविड-२ जीनोमिक्स कंसोर्टियमच्या डाटावरून समोर आले आहे.**

केपी १ आणि केपी २ हे कोरोनाच्या जेएन १ चा उप-प्रकार आहे. या आजाराची गंभीर लक्षणे दिसून आलेली नाहीत. रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्याही कमी आहे. या प्रकारांमध्ये उत्परिवर्तनाची प्रक्रिया सुरूच राहणार आहे. देशातील सात राज्यांमध्ये केपी १ प्रकरणे नोंदवली गेली आहेत, त्यापैकी सर्वाधिक २३ प्रकरणे पश्चिम बंगालमध्ये आढळून आली आहेत. गोवा, गुजरात, हरियाणा, महाराष्ट्र, राजस्थान, उत्तराखंड या राज्यांमध्ये केपी १ संक्रमित रुग्ण आढळले आहेत. देशात केपी २ ची लागण झालेल्या रुग्णांची संख्या २९० आहे, त्यापैकी सर्वाधिक रुग्ण महाराष्ट्रात १४८ एवढे आढळून आले आहेत. तसेच दिल्ली, गोवा, गुजरात, हरियाणा, कर्नाटक, मध्य प्रदेश, ओडिशा, राजस्थान, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पश्चिम बंगालमध्ये रुग्ण आढळले आहेत.

### रुग्णांमध्ये गंभीर लक्षणे दिसत नाहीत

आरोग्य मंत्रालयाशी संबंधित सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, केपी १ आणि केपी २ हे देखील कोरोनाच्या जेएन १ प्रकाराचे उप-प्रकार आहेत. मात्र, या प्रकाराची लागण झालेल्या रुग्णांमध्ये अद्याप या आजाराची गंभीर लक्षणे दिसून आलेली नाहीत. रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्याही कमी आहे. अशा परिस्थितीत काळजी करण्यासारखे काही नाही. आरोग्य मंत्रालयाच्या सूत्रांनी सांगितले की, या प्रकारांमध्ये उत्परिवर्तनाची प्रक्रिया सुरूच राहील आणि हे कोरोना विषाणूचे स्वरूप देखील आहे.

## नांगरे पाटलांच्या नावावर महिलेला ४० लाखांचा गंडा

अलिबाग : फसवणुकीचे अनेक प्रकार घडतात. आता मात्र, बड्या पोलिस अधिकाऱ्याच्या नावाने गंडा घातला जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पोलीस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांच्या नावाने एका महिलेला ४० लाखांचा गंडा घालण्यात आला आहे. अलिबागमध्ये ही धक्कादायक घटना घडली आहे. विश्वास नांगरे पाटील यांचे नाव घेत गंडा घातल्याने एकच खळबळ उडाली आहे.

## ओबीसी प्रमाणपत्रावरुन ममता बॅनर्जींना झटका

**कोलकाता । वृतसंस्था**

कोलकाता हायकोर्टाने महत्त्वाचा निर्णय दिला असून प. बंगालमधील ओबीसी प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहेत. उच्च न्यायालयाचा हा निर्णय ममता बॅनर्जी सरकारला मोठा धक्का मानला जातो. त्यातच मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रमाणपत्र देण्याची मागणी केली, सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासही सुरुवात केली. त्यामध्ये, १९६७ च्या अगोदरचा कुणबी असल्याचा पुरावा ग्राह्य धरुन मराठा समाजाला कुणबी म्हणजेच ओबीसीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तर, दुसरीकडे राज्य सरकारने मराठा समाजाला आरक्षणही दिले आहे. मात्र, या आरक्षणावर सध्या कोर्टात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातही असाच प्रकार तर होणार नाही ना? अशी चर्चा आहे.

# आ.धस यांच्या प्रयत्नाने कीर्गीस्तानमध्ये अडकलेला असीम सय्यद उद्या येणार भारतात

**पाटोदा । प्रतिनिधी**

**कीर्गीस्तान मध्ये उसळलेल्या हिंसाचार दरम्यान तेथे भारतातील तब्बल १५००० तरुण अडकले असून यामध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचाही समावेश आहे या विद्यार्थ्यांना सुखरूप भारतात पोहोचण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करावेत अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी कालच राज्य शासनाकडे केली होती.कीर्गीस्तान मध्ये पाटोदा येथील माजी जिल्हा परिषद अध्यक्ष व नगरसेवक सय्यद अब्दुल्ला यांचा पुतण्या व सय्यद शफीओद्दीन यांचा मुलगा डॉक्टर सय्यद असीम हा पण होता परंतु आमदार सुरेश आण्णा धस यांच्या प्रयत्नाने डॉक्टर सय्यद असीम हा उद्या भारतात पोहोचत असून यामुळे मा.जि.प.अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला व सय्यद शफ्फुओद्दीन यांनी आमदार सुरेश धस यांचे आभार मानले.**



कीर्गीस्तान या देशात हिंसाचार उसळलेला होता या हिंसाचारात भारतीय विद्यार्थ्यांच्या होस्टेलवर सुद्धा हल्ले करण्यात आले असून यामध्ये भारतीय तरुण भीतीच्या छायेखाली वावरात असताना त्यांनी कुटुंबांचे वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मदतीची याचना केली होती. भारतीय विद्यार्थ्यांच्या होस्टेलमध्ये घुसून हिंसाचार करणारे अतिशय बेदम मारहाण करत होते. तुर्कस्तान मध्ये पाटोदा येथील माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला यांचा पुतण्या व सय्यद शेफिओदिन यांचा मुलगा डॉक्टर सय्यद असीम हा एम.बी.बी.एसचे शिक्षण घेत होता तोही तुर्कस्तानच्या उसळलेल्या या हिंसाचारामध्ये अडकला होता. सय्यद अब्दुल्ला व सय्यद शफीओद्दीन यांनी मुलाला सुखरूप भारतात आणण्यासाठी आमदार सुरेश धस यांची भेट घेऊन त्यांना विनंती केली त्यानुसार आ.धस यांनी राज्य शासनाकडे मागणी केली.

### आ.धस यांच्या प्रयत्नाने माझा मुलगा सुखरूप- सय्यद शफ्फुओद्दीन

माझा मुलगा डॉक्टर सय्यद असीम हा कीर्गीस्तान मध्ये एम.बी.बी.एसचे शिक्षण घेत होता.तुर्कस्तान मध्ये उसळलेल्या हिंसाचारामध्ये भारतीय विद्यार्थी व तरुण तेथील हिंसाचार करणाऱ्यांनी टार्गेट केले होते.त्यामुळे मी व माझे सर्व कुटुंब अस्वस्थ झाले होतोत. माझा मुलगा डॉक्टर सय्यद असीम हा कीर्गीस्तान मध्ये एम.बी.बी.एसचे शिक्षण घेत असल्याचे मी व माझे बंधू सय्यद अब्दुल्ला यांनी आ. सुरेश आण्णा धस यांना भेट घेऊन ही माहिती सांगितली त्यांनी प्रयत्न करून माझा मुलगा उद्या भारतात पोहोचेल असे सांगितले. त्यामुळे माझा व माझ्या सर्व कुटुंबाचा श्वास मोकळा झाला व आ.सुरेश आण्णा धस यांचे आम्ही व आमचे सर्व कुंटुब खुप खुप आभारी आहोत असे सय्यद शफ्फुओद्दीन म्हणाले.

## पान १वरून...

### महाराष्ट्रकराचे पैसे काश्मीरच्या

जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शहापूर गावातील ८२ शेतकऱ्यांचे अनुदान चक्क जम्मू काश्मीर येथील शहापूर गावात जात असल्याच समोर आले आहे. ज्या कोडवर पैसे जमा होत आहे. ते जम्मू काश्मीर येथील जेके असा कोड आहे. तेथील शहापूर गावात जात आहे. अमरावती जिल्ह्यातील शेतकरी गेल्या २ वर्षांपासून तक्रार करत आहे. मात्र ते पैसे जाते कुठे हे कळत नव्हते.

--------------------

### बीड जिल्ह्याला

माजलगाव पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु होती. ही कारवाई पोलिस अधिक्षक संदिप आटोळे, अप्पर अधिक्षक मुकुंद आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधिक्षक शंकर शिंदे, हनुमान गोरे, संतोष राठोड, स्नेहलकुमार कोरडे, गणेश म्हेत्रे आदिंनी केली.

---------

### डाळ महागली

देशात तुरीचे पीक केवळ खरिप हंगामात घेतले जाते. या पिकात ९.३२ टक्क्यांची तूट होतीच, मात्र अनियमित पावसामुळे पीक मोठ्या प्रमाणावर खराब होऊन प्रत्यक्ष उत्पादनात मोठ्या तुटीची चिन्हे आहेत. दुसरीकडे, कांदा किरकोळ बाजारात ८० रुपये व टोमॅटो ६० रुपये प्रति किलोवर गेला असून, शंभरीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. शिवाय सर्वच भाज्या किमान ८० रुपये किलो झाल्याने सर्वसामान्यांचे हाल होत आहेत.

**डाळींचे दर**

तूर डाळ १७० रु., उडीद डाळ १३० रु., मूग डाळ १२० रु., मठ डाळ १३० रु., हरभरा डाळ ८२ रु.

**सरकारी डाळ ७० ने विक्री?**

सरकारी डाळ सध्या मॉलमध्ये विक्रीला ठेवण्यात आली आहे. ६० रुपये किलोने हरभरा डाळ विकत आहे. काही लोक हीच डाळ खरेदी करून बाजारात ७० ने विक्रीचा प्रयत्न करीत असल्याचे व्यापारी सांगत आहेत.

**अवकाळीचा डाळीवर परिणाम**

डाळींमध्ये सर्वांत तूर डाळ महाग असल्याचे चित्र आहे. मागील तीन महिन्यांत किलोमागे २० रुपयांनी, तर वर्षभरात ४० रुपयांनी तूर डाळ महागली. मागील हंगामात अवकाळी पावसाने तुरीच्या उत्पादनावर परिणाम झाला होता. अशीच परिस्थिती राहिल्यास ऑगस्ट सप्टेंबरपर्यंत दर १९० ते २०० पर्यंत जातील, असा अंदाज व्यापारी व्यक्त करत आहेत.

----------

### हेमंत सोरेन यांना

अंतरिम जामीन देण्यास नकार दिला. हेमंत सोरेनच्या अंतरिम जामीन याचिकेवर देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, कनिष्ठ न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेतली आहे. एवढेच नाही तर या प्रकरणात नियमित जामीन अर्जही फेटाळण्यात आला आहे. अशा स्थितीत तुमच्या अटकेला आव्हान देणाऱ्या याचिकेत ऐकण्यासारखे ठोस असे काहीच नाही. यासोबतच न्यायालयाने सोरेन यांचे वकील कपिल सिब्बल यांना सांगितले की, तुमच्या पक्षकाराच्या याचिकेत अनेक तथ्ये लपवण्यात आली आहेत. यामुळे तुमच्या याचिकेच्या गुणवत्तेचा विचार न करता अटकेविरोधातील याचिका फेटाळून लावू, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. यानंतर सिब्बल यांनी अंतरिम जामिनाचा अर्ज मागे घेतला.

**अखेर अल्पवयीन**

केला. तर या आरोपीने केलेले कृत्य हे अत्यंत भीषण असे आहे, त्यामुळे त्यांच्यावर खटला चालवण्यासाठी परवानगी देण्यात यावी अशी मागणी पोलिसांच्या वतीने करण्यात आली.

**पोलिसांनी नव्या कलमाची वाढ केली**

पुण्यातील कल्याणीनगरमधील अपघाताला कारणीभूत ठरलेल्या अल्पवयीन मुलावर दाखल गुन्ह्यात पोलिसांनी नव्या कलमाची वाढ केली आहे. त्यानंतर अल्पवयीन आरोपी मुलाने कोर्टात हजेरी लावली आहे. मद्यधुंद अवस्थेत कार चालवल्याप्रकरणी अल्पवयीन मुलावर १८५ कलमाच्या अंतर्गत नव्याने गुन्हा दाखल करण्यात आला. याआधी त्याच्यावर कलम ३०४ अंतर्गत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र अल्पवयीन असल्याच्या कारणावरुन न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला होता.

-------

### निवडणूक आयोगाच्या गलथानपणाचा

निवडणूक आयोगाच्या अकार्यक्षमतेमुळेच हे सगळे झाले आहे. लोकांना मतदान करायचे होते मात्र कुठे नावंच नाही, कुठे मतदान केंद्रच दूर अशा घटना घडल्या आहेत. १५०० लोकांची एक यादी अशा याद्या तयार करण्यात आल्या आहेत. ५०० ते ७५० लोकांपेक्षा जास्त मतदारांची यादी नसावी. जेणेकरुन ते एका मशीनवर मतदान करु शकतात. यावेळेस निवडणूक आयोगाने काय केले माहीत नाही. समजा १५०० पैकी साठ टक्के लोक मतदानाला उतरले तर ९०० लोक झाले. १५०० लोकांसाठी एक मशीन आधी दोन मशीन दिल्या जात होत्या. यावेळी सगळीकडे एकच मशीन. त्यामुळे मतदान पूर्णच झाले नाही. मतदान करायला लोकांना चार-चार तास लागत होते ही वस्तुस्थिती आहे, असा आरोपही निवडणूक आयोगावर त्यांनी केला. जितेंद्र आव्हाड पुढे बोलताना म्हणाले की, आमच्याकडे १२ लोक रांगेतच बेशुद्ध पडले. हॉस्पिटलला न्या, उपचार करा हे सगळे फक्त मी कळवा, मुंब्रा या ठिकाणांबद्दलच बोलतो आहे. हे प्रकार राज्यात सगळीकडे झाले. मला आधी सांगा १५०० लोकांची यादी करणारा मागे नेमका कोण आहे? हे निवडणूक आयोगाने तपासले पाहिजे. आणखी एक प्रकार घडलाय तो म्हणजे समजा एक इमारत आहे आणि तिथे एका कुटुंबात पाचजण असतील तर पाचही जणांचे मतदान वेगवेगळ्या केंद्रांवर, याचा अर्थ काहीही लक्ष देण्यात आलेले नाही. एकाच कुटुंबातले लोक आहेत. तर त्यांचे नाव वेगवेगळ्या शाळांमध्ये कसे? हे देखील सगळीकडे झाले आहे. ईव्हीएम मशीन मंदावल्या कशा हे तर न उलगडणारे कोडे आहे. या मशीन जाणीवपूर्वक मंद केल्या गेल्या होत्या असे आमचे मत आहे. असे आव्हाड म्हणाले.

---------------

### गहिनीनाथ गडाचे मठाधिपती

खाजगी रुग्णालयात घेऊन जाणार असल्याची माहिती मिळतेय.अपघात कसा झाला ? याचे कारण अस्पष्ट असून मात्र महाराजांची प्रकृती ठीक असून सतत उपचार घेत असलेल्या पुणे येथील खाजगी रुग्णालयात त्यांना इतर तपासणीसाठी घेऊन जाणार असल्याची माहिती समजते

दैनिक **राज्य लोकतंत्र**

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. २३ मे २०२४ ३

# बारावीच्या परीक्षेत शेख अशरचे यश

**बीड । प्रतिनिधी**



बारावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवार (दि.२१) रोजी जाहीर झाला.या परीक्षेत बीड येथील शेख मोहम्मद अशरने ८६ टक्के गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. अशरच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

विद्यार्थी दशेतील महत्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्र बोर्डाच्या बारावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवार (दि.२१) रोजी दुपारी १ वाजता जाहीर झाला.या परीक्षेत बीड शहरातील शेख मोहम्मद अशर शेख शकील इंग्रजीत ७६, हिंदीत ८२, गणितात ९७, भौतिकशास्त्रात ८६, रसायन शास्त्रात ८२ व जीवशास्त्रात ८९ गुण घेत तब्बल ८६ टक्के गुण मिळविले आहे. राजीव गांधी उर्दू प्राथमिक विद्यालय रायमोहतून दुसरा क्रमांक अशरने मिळविला आहे.महाराष्ट्र राज्य जीवनोत्ती विभागाचे बीड जिल्हा व्यवस्थापक शेख शकील यांचा तो चिरंजीव आहे. अशरच्या या यशाबाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# गाडी सोडली नाही म्हणून पोलीसांना जिवे मारण्याचा प्रयत्न

## चकलांबा पोलिस ठाणे हद्दीतील घटना;एक कोटीचा मुद्देमाल जप्त

**गेवराई । प्रतिनिधी**

बुधवारी सकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान चकलांबा पोलिस ठाणे हद्दीत आयपीएस डॉ धिरजकूमार बच्चू यांच्या पथकातील कर्मचारी यांनी तिन अनाधीकृत वाळू उपसा करणाऱ्या हायवा पकडल्या तसेच त्या चकलांबा पोलिस ठाण्यात घेऊन जात असताना एक काळ्या रंगाची विना नंबरची स्कॉर्पिओ आडवी लाऊन माझी गाडी सोडा एक देतो असे म्हणाला व पोलिस कर्मचारी यांच्याशी हूज्जत घालू लागला रस्त्याच्या कडेला पडलेल्या काट्या बाजूला सारण्यासाठी उतरलेल्या पोलिस कर्मचारी यांच्या अंगावर हायवा गाडी घालण्याचा प्रयत्न करूण उमापूरच्या माफियांना गाडी पळवली असल्याची घटना आज ( दि २२ मे ) रोजी सकाळी सातच्या दरम्यान घडली आहे.तसेच या कार्यवाईत एक कोटीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ही कार्यवाई आयपीएस डॉ धिरजकूमार बच्चू यांच्या पथकाने केली आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी की,आयपीएस धिरजकूमार बच्चू यांना एका गूप्त बातमीदाराने माहिती दिली की राक्षसभूवन परिसरातून उमापूर मार्गे नगर जिल्ह्यात वाळूने भरूण हायवा घेऊन जात आहेत त्यानूसार पथकातील तिन पोलिस कर्मचारी खाजगी वाहनाने माजलगाव वरून राक्षसभूवन परिसरात आले राक्षसभूवन ते उममापूर रस्त्यावर एक विना नंबरचा हायवा याला अडविले तसेच त्याला रॉयल्टीची विचारना केली असता चालकाने पावती नाही म्हणून सांगितले तसेच गाडी नंबर सांगण्यास नकार दिला त्यापाठोपाठ दूर्सया दोन हायवा आल्या त्यांना ही ताब्यात घेऊन जात असताना मध्येच काळ्या रंगाची स्कॉर्पिओ आडवी लाऊन माझी गाडी लाऊ नका मी एक लाख रूपये देतो असे म्हणून हूज्जत घालू लागला मात्र पोलिस कर्मचारी कूठल्याही आमिषाला बळी न पडल्याचे लक्षात येताच रस्त्यात बाबळीचे झाडे अडवी लावली ते काढण्यासाठी पोलिस कर्मचारी रस्त्यावर उतरला याच संधीचा फायदा घेऊन हायवा चालकाने व मालकाने हायवा पोलिस कर्मचारी अंगावर घालून पलायन केले आहे तसेच या चालकांचे नाव शारूख शब्बीर पठाण रा चकलांबा व अहमद भाई असल्याची माहिती असून ज्या पोलिस कर्मचारी यांच्या अंगावर गाडी घातली त्यांचे नाव अस्तिककूमार देशमूख असल्याचे समजते तसेच या प्रकरणी चकलांबा पोलिसांत गून्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू असून एक कोटीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

# इस्कॉन मंदिरात नृसिंह चतुर्दशी निमित्त यज्ञसंपन्न

**बीड । प्रतिनिधी**

सावता माळी चौकातील श्री राधा गोविंद मंदिर या ठिकाणी २० मे ते २२ मे रोजी नृसिंह चतुर्दशी महोत्सव मोठ्या उत्साहा मध्ये साजरा करण्यात आला.

भगवद्गीतेमध्ये सांगितल्याप्रमाणे ''यदा यदाही धर्मस्य ग्लानीर्? भवती भारत!''



ज्या ज्या वेळ धर्माचा ऱ्हास होतो त्यावेळी साधू संतांचा रक्षण करण्यासाठी व राक्षसांचा नायनाट करण्यासाठी प्रत्येक युगामध्ये भगवंत अवतार घेतात. आपल्या भक्तांना आनंद देण्यासाठी व त्यांच्याबरोबर वीर रसाचे आस्वादन करण्यासाठी भगवंत नेहमीच प्रकट होत असतात व नृसिंह चतुर्दशी या दिवशी प्रल्हादाला रक्षण करण्यासाठी व हिरण्यकश्यपूर्वक करण्यासाठी श्री नृसिंह भगवंत सत्य युगामध्ये प्रकट झाले, असे प्रतिपादन श्रीमान संतदास प्रभू यांनी नृसिंहलीला कथन करताना सांगितले.

वैकुंठामधून चार कुमारांच्या शापामुळे जय विजय हे पृथ्वीतलावर येऊन त्यांनी असुराच्या रूपामध्ये कशाप्रकारे भगवंतांची युद्ध केले आणि स्वतःचा उद्धार करून घेतला याचेही प्रतिपादन त्यांनी केले. नृसिंह चतुर्दशीच्या दिवशी दुपारी ठीक तीन वाजता श्री लक्ष्मीनृसिंह यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी भाविक भक्तांना यज्ञांच्या मंत्रांनी श्रीमान जगन्नाथ कृपाप्रभू मंत्रमुग्ध करून टाकले. त्यानंतर श्री लक्ष्मी नृसिंह भगवंतांचा महाअभिषेक श्रीमान संत दास प्रभू यांची श्री नरसिंह लिहिला कथा झाली. सर्व हजारो भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले अशी माहिती इस्कॉन बीडचे प्रतिनिधी श्रीमान कृष्णनामदास यांनी दिली.

# बारावीच्या परीक्षेत सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या निकालाची उज्वल परंपरा कायम

माजलगाव ( प्रतिनिधी )

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या निकाल जाहीर झाला असुन यामध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाने निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवली आहे.यामध्ये विज्ञान शाखाचा ९७.०८ टक्के, कला शाखेचा ८२.९० टक्के, वाणिज्य शाखेचा ९५.१५टक्के, व्यावसायिक अभ्यासक्रम ९५.५२टक्के निकाल लागला आहे तर महाविद्यालयाचा एकूण निकाल ९२.६५टक्के लागला आहे.

बारावीच्या परीक्षेत सुंदराव सोळंके महाविद्यालयातील विज्ञान शाखेतुन प्रथम सोळंके सिद्धी गोरखनाथ (९०.६७%), द्वितीय गायकवाड संस्कृती सखाराम (८९.८३%), तृतीय तरटे निशा संजय (८९.८३%) कला शाखातुन प्रथम भुंगासे दत्तात्रय अंबादास (८३.६७%),द्वितीय वाशिंबे नीता महादेव (८१.६७%),तृतीय गायकवाड सिद्धार्थ यादव (७९.६७%) वाणिज्य शाखा प्रथम गारगे नंदिनी नारायण (९०.३३%), द्वितीय खेत्रे ओंकार देवानंद (८४ %),तृतीय फपाळ वैजिनाथ गोपीनाथ (८४%) व्यावसायिक अभ्यासक्रम प्रथम मोरे सुरेखा चंद्रकांत (८२.१७%), द्वितीय आगे अंकुश श्रीराम (७९.३३%), तृतीय डोरमारे श्रीकृष्ण तात्याबा ( ७१.०%) यांनी यश संपादन केले. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे म.शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह विकास समिती सदस्य ॲड.भानुदासराव डक, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ.बी.एल.चव्हाण,प्राचार्य डॉ.जी. के.सानप, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे,प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधिक्षक सतीश एरंडे यांनी अभिनंदन केले.

# जय हिंद उर्दू उच्च माध्यमिक शाळेची यशस्वी निकालाची परंपरा कायम

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नामांकित जय




हिंद कॅम्पस च्या जय हिंद उर्दू उच्च माध्यमिक विद्यालयाची बारावीच्या निकाला संदर्भात यशस्वी निकालाची परंपरा याही वर्षी कायम राहिलेली असून यावर्षी जाहीर उर्दू उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल हा ९७.१४% एवढा लागलेला असून शाळेमधील शेख इफरा कैसर विद्यार्थिनीने ८०.१७% एवढे मार्क घेऊन शाळेमध्ये प्रथम आलेली आहे व द्वितीय क्रमांक वर उम्मे एमण असरार हाश्मी या विद्यार्थिनी ७९.८३% मार्क्स घेतलेले आहे व तृतीय क्रमांकावर शेख अनम जावेद ७८.१७% एवढे मार्क घेऊन उत्तीर्ण झालेले असून सदरील विद्यार्थ्यांना चांगले मार्क घेऊन उत्तीर्ण झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने संस्थेचे सचिव शेख निजाम जैनुद्दीन यांनी व प्राचार्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जय जवान उच्च माध्यमिक विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

**वडवणी । प्रतिनिधी**

अरुणा असफ अली महिला मंडळ बीड संचलित, जय जवान उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव(बू ) ता.वडवणी जि.बीड विद्यालयाचा इ.१२ वी कला निकाल -९४.५९% लागला असून

१) रीहिणी रमेश लोंढे (प्रथम) - ७९.३३%

२) राम बापूराव खरात (द्वितीय) - ७७. ८३%.

३) हिरवे प्रिया भरत (तृतीय) ७७.८३%

गुनानुक्रमे उत्तीर्ण झाले असून व सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेच्या संस्थापिका आदरणीय सुशीलाताई मोराळे मॅडम, संस्थेचे सचिव आदरणीय डॉ. अजीतजी पाखरे साहेब, आदरणीय शिवराजदादा पाखरे साहेब ,संस्थेचे सर्व पदाधिकारी, तसेच गावातील सरपंच,उपसरपंच शिक्षणप्रेमी व मान्यवर पालक वर्ग, विद्यालयाचे प्राचार्य . श्री. सारोक्ते डि.जी व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी इ.१२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. व पुढिल वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सर्व यशस्वी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्यावतीने मन:पूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

## पान ६ वरून...

### औरंगाबादमध्ये महावितरणच्या

औरंगाबाद जिल्ह्यात बसविण्यात येत असेल तर सद्यस्थितीत येत असणाऱ्या बिलामध्ये दुपटीने फरक होणार आहे, याकरिता वंचित बहुजन आघाडी या स्मार्ट मीटरचा विरोध दर्शवित सहाय्यक अभियंता सचिन लालसरे व उपकार्यकारी अभियंता उच्चदाब विभाग प्रसाद पाठक यांना वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने निवेदन दिले.सोबतच स्मार्ट मीटर सरकारला बसवायचेच असतील तर भाजपच्या सर्व अंध भक्तांच्या पदाधिकारी व कार्यकर्ते तथा मतदार यांच्या घराला बसवावे अशी मागणी चर्चेदरम्यान शहर कार्यकारी अभियंता यांच्या सोबत करण्यात आली.

यावेळी वंचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष योगेश गुलाबराव बन, मंगेश निकम, मिलिंद बोर्डे, सुभाष कांबळे, प्रवीण जाधव,पंडित तुपे, रवी रत्नपारखे, ज्येष्ठ कार्यकर्ते बाबासाहेब वक्ते आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सिंदफणा विद्यालयाची

कला शाखेतून चव्हाण मनीषा ७२.५०% दुतीय, चव्हाण सिमरन ७१.६७% तृतीय.विद्यालयातून विशेष प्रवीण्य सह उत्तीर्ण होणारे विद्यार्थी एकूण ४० विद्यार्थी असून प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण होणारे वीस विद्यार्थी आहेत. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा. शिवाजी(भाऊ) रांजवन ,सचिव प्रतापरावजी रांजवन साहेब ,विद्यालयाचे प्राचार्य जगन्नाथ सरवदे .पर्यवेक्षक वाय बी भोसले नंदकुमार शिंदे पाटील. संदिपान कांबळे गणेश ठाकूर प्रा. श्रीनिवास काकडे प.ज्ञानदेव बडे. प्रा. सुनील मुंडे. प्रा. भारत आजबे.प्रा. दत्तात्रय कदम प्रा. मसुराम गोंडे प्रा. जाधव . रामेश्वर नाईक नवरे . अमोल सोळंके आदींनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पिंपळनेर येथील सिद्धिविनायक कनिष्ठ महाविद्यालयची यशस्वी निकालाची परंपरा कायम

## विज्ञान व कला या दोन्हीही शाखेचा शंभर टक्के निकाल

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांनी फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या बारावी परीक्षाचा निकाल मंगळवार दि.२१ मे २०२४ रोजी मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला यामध्ये पिंपळनेर येथील, सिद्धिविनायक कनिष्ठ महाविद्यालयाने यशस्वी निकालाची परंपरा कायम ठेवली आहे सलग नऊ वर्षापासून विज्ञान व कला शाखेचा १०० % निकाल लागतलागत आहे यावर्षी सुद्धा दोन्ही शाखेचा निकाल १०० % लागला आहे विज्ञान शाखेमध्ये विशेष प्राविण्यासह - १३२विद्यार्थी व प्रथम श्रेणी-३२ विद्यार्थी पास झाले असून विज्ञान शाखेत एकूण १६४ विद्यार्थी परीक्षेत बसले होते सर्वची सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर कला शाखा विशेष प्राविण्यासह- २५ विद्यार्थी तर प्रथम श्रेणीमध्ये ४९ विद्यार्थी तसेच द्वितीय श्रेणी-३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून एकूण ७५ विद्यार्थी परीक्षेत बसले होते ते सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

महाविद्यालयातील विज्ञान शाखेतून कु.तागड शिवानी रोहिदास ८५.३३,% गुण घेवुन प्रथम क्रमांक मिळवला तर द्वितीय क्रमांक चि. कुलकर्णी चिन्मय मिलिंद व माने सार्थक जालिंदर या दोघांनीही ८५ % गुण घेऊन प्राप्त केला तर तृतीय क्रमांक कु.आमटे तनवी सुधाकर हिने ८४.८३ % गुण घेवुन मिळवला तसेच कला शाखेतून कु.वाजे आकांक्षा अंगद ८३.१६ % गुण घेऊन प्रथम क्रमांक आला तर द्वितीय क्रमांक कु.चव्हाण पूजा रामभाऊ ८३.००% गुण घेऊन प्राप्त केला तसेच कु.शिंदे रोहिणी तात्याबा ८१.३३ % टक्के गुण घेवुन तृतीय क्रमांक आला .

या यशाबद्दल संस्थेचे सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तसेच श्री. राजाभाऊ बप्पा वारे,उपाध्यक्ष तथा युवा नेते श्री.संजय भाऊ आंधळे व संचालक श्री.रंजित भैय्या धस यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचार्यांचे कौतुक करून अभिनंदन केले तसेच प्राचार्य व महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# खडकीघाट येथील रुक्मिणीबाई सावंत यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील खडकीघाट येथील रुक्मिणीबाई श्रीपती सावंत यांचे मंगळवार दिनांक २१ मे २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले आहे. मृत्यूसमयी त्यांचे वय साधारण ९० वर्षे होतं.



बीड च्या बंकटस्वामी महाविद्यालयातील मुख्य लिपिक कल्याण श्रीपती सावंत यांच्या त्या आई होत्या. मागच्या वर्षभरापासून रुक्मिणीबाई सावंत ह्या वार्धक्य व्याधीने आजारी होत्या. मंगळवारी (दि.२१) सकाळी १०.३० वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. शहरातील बार्शी रोडवर असलेल्या भगवानबाबा प्रतिष्ठान येथे मंगळवारी सायंकाळी ५ वाजता त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

मागच्या काही वर्षांपासून शहरातील बाजीराव नगर, बार्शी नाका येथे येथे त्या वास्तव्याला होत्या. रुक्मिणीबाई सावंत यांच्या पश्चात मुलगा, सून, मुली, नातवंडे, जावई असा परिवार आहे. पुणे येथे 'सकाळ'मध्ये कार्यरत असलेले संतोष कानडे यांच्या त्या आजी होत्या.



# रिपाइं एकतावादी धारूर तालुका युवा कार्याध्यक्षपदी संतोष जावळे यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांच्या उपस्थितीत धारूर ता. कार्याध्यक्षपदी संतोष जावळे यांची निवड रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी धारूर ता युवा कार्याध्यक्षपदी संतोष जावळे यांची निवड करण्यात आली व सर्कल अध्यक्षपदी विशाल भालेराव यांची निवड करण्यात आली यावेळी जावळे हे म्हणाले की धारूर तालुक्यामध्ये युवकाचे संघटन वाढवून पक्ष मजबूत करू यावेळी उपस्थित तालुका अध्यक्ष महेश शिरसाठ व पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्यात अनेक बोगस प्रवेश; शिक्षण विभागाने गुन्हे दाखल करावेत -जाधव

**बीड । प्रतिनिधी**

आरटीई म्हणजेच शिक्षणाच्या अधिकारा अंतर्गत दुर्बल आणि वंचित घटकातील २५ टक्के विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळेत मोफत प्रवेशाची तरतूद आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी काही अपात्र पालक देखील आपल्या मुलांचे अर्ज दाखल करतात सर्रासपणे खोटे कागदपत्र सादर करत हे प्रवेश मिळवत आहेत. असाच एक प्रकार नागपूर येथील सीताबर्डी येथे उघडकीस आला असून १९ पालकांविरुद्ध गुन्हा दाखल करत एका पालकाला पोलिसांनी अटक केली आहे.

दरम्यान दुर्बल आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी ही योजना असून यात आर्थिकदृष्ट्या सक्षम पालकदेखील आपल्या मुलांना आरटीई अंतर्गत प्रवेश देत असल्याचे उघड झाले आहे. आरटीई अन्वये आपल्या मुलाला प्रवेश मिळावा यासाठी एजंटची मदत घेतली जाते. खोटी कागदपत्रे बनवून ती सादर केली जातात. नागपुरातून हा प्रकार समोर आला आहे. असे हे एकच प्रकरण नाही तर आतापर्यंत दोन वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये १९ पालकांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून एकाला अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. गुन्हे दाखल करण्यात आलेल्या सर्व पालकांनी खोटी कागदपत्र सादर करुन आपल्या मुलांचा प्रवेश केला. यासाठी त्यांना मदत करणाऱ्या एजंटचा शोध पोलीस घेत आहेत. पोलीस उपायुक्त राहुल मदने यांनी यासंदर्भात माहिती दिली. या प्रकरणात आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

### बीड जिल्ह्यात अनेक बोगस प्रवेश; शिक्षण विभागाने गुन्हे दाखल करावेत - मनोज जाधव

**जिल्ह्यात देखील आरटीई अंतर्गत विविध शाळांमध्ये प्रवेश घेताना पालक बोगस कागदपत्र सादर करत असल्याचे निदर्शनास आले होते. यामुळे दुर्बल आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांवर अन्याय होतो. यासंदर्भातील तक्रारी आपण शिक्षण विभागाला दिल्या होत्या. मात्र शिक्षण विभागाकडून याची कसल्याही प्रकारची दखल घेतली नाही गतवर्षी पोद्दार इंग्लिश स्कूल आणि गुरुकुल इंग्लिश स्कूल या ठिकाणी मोठ्या प्रमाणात बोगस प्रवेश झाल्याचे लेखी तक्रार देण्यात आली होती मात्र यावर काही कारवाई झाली नाही. आता तरी शिक्षण विभागाने पुढे येत बोगस प्रवेश घेणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत अन्यथा आपण स्वतः यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यासाठी पुढे येऊ असे मनोज जाधव यांनी म्हटले आहे.**

# जाहीर प्रगटन

मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड याच्या न्यायालयाल

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ७१६/२०२४

(मार्फत विधिज्ञ :- श्री एन के शिरसट)

अर्जदार :- १. सतिश आश्रुबा खामकर, वय ३४ वर्षे, धंदा शेती रा. वडगाव क. ता. जि. बीड, २. आजिनाथ आश्रुबा खामकर, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे ३. सिध्देश्वर आश्रुबा खामकर, वय २७ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे,

विरुध्द

निरंक

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे किसकिंदा आश्रुबा खामकर हे/या दिनांक १३/१०/२०२३ रोजी वडगाव क.ता.जि.बीड येथे मयत असुन अर्जदार क्र.१ ते ३ हे मयताचे मुले आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्याचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- ०९/०५/२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख २४/०६/२०२४

याची प्रती बजावणीस्तव :- बेलिफ विभाग दि.न्या.व.स्तर, बीड

१) ग्रामपंचायत/नगर परिषद कार्यालय, वडगाव क.ता.जि.बीड यांचे नोटीस बोर्डवर डकविणे कामी २) तहसील कार्यालय, बीड यांचे नोटीस बोर्डवर डकविणे कामी ३) दिवाणी न्यायालय, व.स्तर बीड यांचे नोटीस बोर्डवर डकविणे कामी.

स्वाक्षरीत/- क.लिपिक

कोर्टाचा शिक्का

स्वाक्षरीत/- अधिक्षक दि.न्यायलय व.स्तर बीड

# दुधाचं अनुदान मिळणार कधी? धाराशीवमधील शेतकरी आक्रमक

## रस्त्यावर दूध ओतून केला सरकारचा निषेध



सध्या राज्यातील दूध उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. कारण, एका बाजुला दुधाच्या दरात घसरण झाली आहे. तर दुसऱ्या बाजुला सरकारनं जाहीर केलंलं ५ रुपयांचे अनुदान अद्याप शेतकऱ्यांना मिळालं नाही. त्यामुळं धाराशीव जिल्ह्यातील शेतकरी आक्रमक झाले आहेत. धाराशिवमधील शेकडो दूध उत्पादक शेतकऱ्यांनी रस्त्यावर दूध ओतुन शासनाचा निषेध केला आहे. धाराशिवच्या जुनोनी गावातील दुध उत्पादकांनी अनुदान मिळाले नसल्याने आक्रमक पवित्रा घेतलाय.

दुध डेअरीसमोरच दूध ओतून निषेध : शेतकऱ्यांनी जुनोनी गावातील दुध डेअरीसमोरच दूध ओतून निषेध केला. दूध डेअरी चालकाने दूध उत्पादक शेतकऱ्यांची माहीती, कागदपत्रे शासनाला कळवली नसल्याने अनुदान मिळाला नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेकडो शेतकरी प्रति लिटर ५ रुपये शासकीय अनुदानापासुन वंचित आहेत. या शेतकऱ्यांना अनुदान कधी मिळणार? असा सवाल उपस्थित केला जातोय.

काही भागात पाणी टंचाईचा प्रश्न : एकीकडे राज्यात अवकाळी पाऊस पडतोय तर दुसरीकडे काही भागात पाणी टंचाई जाणवत आहे. या पाणीटंचाईमुळं अहमदनगर जिल्ह्यातील अनेक भागात सध्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासोबतच चाऱ्याचा देखील प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. कारण अनेक ठिकाणी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पाणी नसल्यामुळं चारा उपलब्ध नाही. त्यामुळं जनावरं जगवायची कशी असा प्रश्न देखील शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालाय. दरम्यान, अशा स्थितीत देखील दुधाला कमी दर मिळत आहे. त्यामुळं शेतकरी आक्रमक होताना दिसत आहेत.

दुधाच्या दरात घसरण झाल्यामुळं शेतकरी आक्रमक : राज्यात दुधाच्या दरात घसरण झाल्यामुळं शेतकरी आक्रमक झाले होते. विविध ठिकाणी शेतकऱ्यांनी आंदोलने सुरु केली होती. त्यामुळं सरकारनं या आंदोलनांची दखल घेत पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी गाईचे दूध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना दर पडलेल्या काळात प्रतिलिटर ५ रुपयांचे अनुदान देण्याची योजना जाहीर केली होती.

शेतकऱ्यांना अनुदान जाहीर करुन सरकारनं एक प्रकारचा दिलासा देणयाचा प्रयत्न केला होता. मात्र, अद्यापही काही शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा झाले नाही. त्यामुळं पाच रुपयांचे अनुदान जमी कधी होणार? असा सवाल शेतकरी करताना दिसत आहे. अनुदान मिळालं नसल्यामुळेच धाराशीव जिल्ह्यातील शेतकरी आक्रमक झाले आहे. या शेतकऱ्यांनी शासनाचा निषेध केला आहे.

## खजुराच्या लागवडीतून लाखोंची कमाई



आजकाल भारतात कोणत्याही एका पॅटर्नचे पालन करून शेती केली जात नाही. आता भारतातील शेतकरी नवनवीन पद्धती आजमावत आहेत. शेतकरी आता मोठ्या प्रमाणात फळांची लागवड करत आहेत, ज्यातून त्यांना भरपूर नफा मिळत आहे. भारतातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये हंगामानुसार शेती वेगवेगळ्या पद्धतीने केली जाते. राजस्थानमध्ये खजूर लागवडीमुळे शेतकऱ्यांचे जीवन बदलले आहे. याशिवाय गुजरात, केरळ आणि तामिळनाडूत येथील शेतकऱ्यांना खजूराच्या लागवडीतून लाखोंचा नफा मिळत आहे.

साधारणपणे आखाती देशांमध्ये खजुराची लागवड अधिक होते. जगात सर्वाधिक खजुरांची लागवड इराणमध्ये केली जाते. त्यामुळे आता भारतातही या शेतीकडे लोकांचा कल खूप वाढला आहे. भारतात राजस्थान, गुजरात, केरळ आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये खजूरांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. मात्र आता इतर ठिकाणीही खजूर लागवड होऊ लागली आहे.

एका खजुराच्या झाडाला ७० ते १०० किलो खजूर मिळतात. म्हणजेच आकडे बघितले तर खजुराच्या लागवडीतून एका वर्षात अंदाजे ५ हजार किलो खजूर तयार होतात. बाजारात खजुरांना खूप मागणी आहे, त्यामुळे शेतकरी या शेतीतून लाखोंची कमाई सहज करू शकतात. एका झाडापासून ५० हजार रुपयांपर्यंत उत्पन्न मिळू शकते.

अशी करा खजुराची शेती : खजुराची लागवड करण्याचा उत्तम काळ जुलै ते सप्टेंबर दरम्यान असतो. ही वनस्पती कोणत्याही प्रकारच्या जमिनीत लावता येते. या रोपांची लागवड करताना दोन खजुराच्या रोपांमधील अंतर ८ मीटरपेक्षा जास्त असावे हे लक्षात घेतले पाहिजे.

खजुराची झाडे लागवडीनंतर ३ वर्षांनीच फळ देण्यास सक्षम होतात. खजुराच्या झाडांना जास्त सिंचनाची आवश्यकता नसते. परंतु उन्हाळी हंगामात महिन्यातून १५ ते २० दिवसांनी पाणी द्यावे. त्यामुळे हिवाळ्याच्या काळात महिन्यातून एकदा पाणी दिल्यासही फायदा होऊ शकतो.

## कांद्याचे दर वाढणार कधी? निर्यातबंदी हटवूनही दर जैसे थे, शेतकरी चिंतेत

सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आहे. कारण, कांद्याच्या दरात मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे. कांद्यावरील निर्यातबंदी उठवून आज २० दिवस झाले तरी देखील कांद्याच्या दरात वाढ होताना दिसत नाही. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. बाजारपेठेत कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळं दरात घट झाली आहे. निर्यातबंदी हटवली असली तरी सरकारनं निर्यातीवर दोन अटी घातल्या आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कांदा महाग झाला आहे, मात्र, परदेशात निर्यात होत नसल्याने देशांतर्गत बाजारात आवक वाढली आहे.

केंद्र सरकारनं कांद्यावरील निर्यातबंदी उठवली खरी पण ती उठवताना काही अटी शर्ती घातल्या आहेत. त्यामुळं कांदा निर्यात करण्यास अडचणी निर्माण होत आहेत परिणामी देशात कांद्याचा पुरवठा जास्त होऊन दरात घसरण होत असल्याचं पाहायला मिळत आहे. सध्या शेतकऱ्यांना तोटा सहन करुन कंदा विकावा लागत आहे. आता खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीची वेळ आली आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना पैशांची गरज आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील कांदा कवडीमोल भावाने विकत आहेत.

शेतकऱ्यांची मागणी काय?

सरकारनं निर्यात खुली होऊनही शेतमालाला अतिशय कमी भाव मिळत आहे. त्यामुळे आता निर्यातीवर लादलेली ५५० प्रति टन किमान निर्यात किंमत आणि त्यावर लादलेले ४० टक्के निर्यात शुल्क काढून टाकण्याची मागणी शेतकरी करत आहेत. आता शेतकऱ्यांच्या या मागणीवर सरकार नेमका काय निर्णय घेणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

कांद्याच्या दरात मोठी घसरण

मिळालेल्या माहितीनुसार, काल छत्रपती संभाजी नगरमधील शेतकऱ्यांना कांद्याचा किमान भाव केवळ २ रुपये प्रति किलो इतका मिळाला. तर कमाल भाव १५ रुपये तर सरासरी ८.५ रुपये प्रति किलो होता. तिन्ही किमती किमतीपेक्षा कमी होत्या. कांद्याचा उत्पादन खर्च १८ रुपयांवरून २० रुपये किलोपर्यंत वाढल्याचा दावा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे २० रुपयांपेक्षा कमी भाव असल्यास तोटा होतो. अशी माहिती शेतकऱ्यांनी दिली. अकोल्यातही कांद्याला किमान किंमत ८ रुपये, कमाल १६ रुपये आणि सरासरी १२ रुपये प्रति किलो होती.

बाजारात कांद्याला किती भाव?

छत्रपती संभाजीनगर - किमान २०० ते कमाल १५०० रुपये आणि सरासरी ८५० रुपये प्रतिक्विंटल, अकोला - किमान ८०० रुपये ते कमाल १६०० रुपये आणि सरासरी १२०० रुपये प्रतिक्विंटल, राहाता - किमान भाव केवळ २५० रुपये प्रतिक्विंटल राहिला. कमाल भावही २१०० रुपये आणि सरासरी भाव १५०० रुपये प्रतिक्विंटल , सोलापूर - किमान भाव केवळ १०० रुपये, कमाल २५०० रुपये आणि सरासरी १३०० रुपये प्रतिक्विंटल होता.




## शेळ्यांचे वजन कमी होण्याची कारणे आणि उपाय

शेळीपालन व्यवसायाचा विचार केला तर प्रामुख्याने मांस उत्पादनासाठी शेळ्यांचे पालन केले जाते. परंतु शेळ्यापासून मिळणारे मांस उत्पादन हे शेळ्यांच्या वजनावर अवलंबून असते. परंतु बऱ्याचदा काही कारणांमुळे शेळ्यांचे वजन कमी होते किंवा वाढत नाही व त्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांना फार मोठा आर्थिक फटका बसू शकतो. त्यामुळे शेळ्यांचे वजन कमी होण्याची कारणे आणि त्यावरील उपाययोजना यांची माहिती असने गरजेचे आहे.

शेळ्यांचे वजन कमी होण्याचे कारणे :

शेळ्यांमध्ये बऱ्याच प्रकारचे रोग उद्भवतात व त्यामुळे वजनावर विपरीत परिणाम होतो. दुसरे कारण म्हणजे जेव्हा कळपात शेळ्या राहतात तेव्हा चाऱ्यासाठी एकमेकांमध्ये स्पर्धा निर्माण होते, ही बाब देखील शेळ्यांच्या शरीराचे वजन कमी करण्यास कारणीभूत आहे. कळपामध्ये ज्या शेळ्या थोड्या दुर्बल किंवा विनम्र असतात अशा शेळ्यांचे वजन कमी होते. साहाजिकच कळपातील मजबूत आणि मोठ्या शेळ्या कमकुवत शेळ्यांच्या अन्न आणि जागेवर अधिकचा हक्क सांगतात व आहारात प्रवेश नाकारला जात असल्याने कमकुवत शेळ्यांना



चारा व्यवस्थित मिळत नाही व शेळ्यांचे वजन घटते.

या समस्येवर उपाय : शेळ्यांचे व तसेच त्यांच्या जाती व शारीरिक स्थितीनुसार त्यांचे वर्गीकरण करणे नेहमीच योग्य असते. जर शेळ्यांमध्ये दातांची समस्या असेल तर यामुळे देखील वजन कमी होऊ शकते. दातांच्या समस्या मुळे चारा खाण्याच्या आणि गिळण्याच्या सामान्य प्रक्रियेवर विपरीत परिणाम होतो. यामुळे शेळ्यांना पुरेशा चाऱ्यापासून वंचित राहावे लागते. या समस्येवर उपाय म्हणून वजन कमी करण्याच्या तपासणीमध्ये दात परिक्षण करून घेणे महत्त्वाचे असते. दातांची समस्या ही विविध प्रकारच्या खनिजांची कमतरता किंवा फ्लोरोसिसच्या अतिरेकामुळे होत असते. शेळ्यांच्या तोंडाची तपासणी वेळोवेळी करावी. कोबाल्टची कमतरता असली तर शरीराच्या वजनात वाढ होणे थांबते. सेलेनियम हे मेंढी पालन आणि शेळीपालन मध्ये एक महत्त्वाचा घटक आहे. याच्या कमतरतेमुळे मादी प्राण्यांमध्ये गर्भपात आणि प्रजनन संस्थेचे समस्या वाढते. याच्या कमतरतेमुळे कोकरांची कमकुवत वाढ होते व विकास देखील थांबतो. एवढेच नाही तर कोकरामध्ये अचानक मृत्यूचे समस्या देखील दिसून येते. या समस्येवर उपाय म्हणून जनावरांना खनिज मिश्रण पावडर दिले गेले पाहिजे. जोन्स रोग : मेंढी आणि शेळ्यांमध्ये हा जुनाट आजार आहे व हा वजन कमी करण्यासाठी कारणीभूत ठरतो. यामध्ये खाद्य योग्य प्रमाणात खाल्ले तरीही प्रादुर्भावित प्राण्याच्या जबड्यात खाली पाणी जमा होते, अशक्तपणा येतो तसेच मेंढ्यांमध्ये लोकर कमी होते, हगवन इत्यादी लक्षणे दिसतात. शेळ्यांच्या पायाला लंगडेपणा असणे हीदेखील एक समस्या असून हा रोग एका प्राण्यापासून दुसऱ्या प्राण्यांमध्ये पसरतो व वजन कमी करत असतो.




### महत्वाच्या घटना

१५६८ : नेदरलँड्सला स्पेनपासून स्वातंत्र्य.
१७३७ : पोर्तुगीजांकडुन जिंकल्यानंतर पेशव्यांनी अर्नाळा किल्ला परत बांधून घेतला.
१८०५ : नेपोलियन बोनापार्टला इटलीचा राज्यपदी राज्याभिषेक.
१८२९ : सिरील डेमियनला ॲकॉर्डियन या वाद्याचे पेटंट मिळाले.
१९११ : न्यू यॉर्क सार्वजनिक ग्रंथालय सामान्य जनतेस खुले.
१९४९ : पश्चिम जर्मनी हे राष्ट्र अस्तित्त्वात आले.
१९५१ : तिबेट देशाने चीनबरोबर तिबेटच्या शांततेत मुक्तीसाठी सतरा बिंदू करार केला.
१९५६ : आयुर्विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करण्यासंबंधीचे विधेयक मंजूर झाले.
१९५८ : अमेरिकेचा पहिला उपग्रह एक्सप्लोरर १ बंद पडला.
१९८४ : बचेंद्री पाल या महिलेने एव्हरेस्ट शिखर चढून जाणारी पहिली भारतीय महिला होण्याचा मान मिळविला.
१९९५ : जावा संगणक भाषेची अधिकृत घोषणा.
१९९७ : माऊंट एव्हरेस्ट हे सर्वोच्च शिखर सर्वप्रथम सर करणार्या तेनसिंग नोर्गे यांचे नातू ताशी तेनसिंग यांनी माऊंट एव्हरेस्ट सर केले.
२००८ : भारतीय लष्कर दलाच्या सैन्यांनी जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या पुर्थ्वी-२ या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली.
२०१६ : भारतीय अंतरीक्ष संशोधन संस्था इस्रो ने आंध्रप्रदेश मधील श्रीहरिकोटा अंतराळ केंद्रातून संपूर्ण भारतीय बनावटीचे अंतराळ शटल आरएलव्ही-टीडी ची स्थापना केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०५२ : फ्रान्सचा राजा फिलिप (पहिला) यांचा जन्म. (मृत्यू: २९ जुलै ११०८)
१७०७ : स्वीडीश वनस्पतीतज्ञ कार्ल लिनिअस यांचा जन्म. (मृत्यू: १० जानेवारी १७७८)
१८७५ : अमेरिकन उद्योगपती आल्फ्रेड पी. स्लोन यांचा जन्म. (मृत्यू: १७ फेब्रुवारी १९६६)
१८९६ : जुन्या जमान्यातील रंगभूमीवरील श्रेष्ठ संगीत समीक्षक केशवराव भोळे यांचा जन्म.
१९१८ : इंग्लिश क्रिकेटपटू डेनिस कॉम्पटन यांचा जन्म. (मृत्यू: २३ एप्रिल १९९७)
१९१९ : जयपूरच्या राजमाता महाराणी गायत्रीदेवी यांचा जन्म. (मृत्यू: २९ जुलै २००९)
१९२२ : प्रख्यात भारतीय उपखंडातील इतिहासकार रणजीत गुहा यांचा जन्मदिन.
१९२६ : मार्क्सवादी कम्युनिस्ट नेते पी. गोविंद पिल्लई यांचा जन्म. (मृत्यू: २२ नोव्हेंबर २०१२)
१९२६ : भारतीय बिशप बॅसिल साळदादोर डिसोझा यांचा जन्म. (मृत्यू: ५ सप्टेंबर १९९६)
१९३३ : मुद्रितशोधन तज्ञ मोहन वेल्हाळ यांचा जन्म.
१९४३ : पटकथालेखक आणि दिग्दर्शक कोवेलमूडी राघवेंद्र राव यांचा जन्म.
१९४५ : भारतीय दिग्दर्शक, पटकथालेखक आणि लेखक पद्मराजन यांचा जन्म.(मृत्यू: २४ जानेवारी १९९१)
१९४८ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित माजी सेवानिवृत्त भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी आणि भारताचे माजी नियंत्रक आणि महालेखा परीक्षक विनोद राय यांचा जन्मदिन.
१९५१ : रशियन बुद्धीबळपटू अनातोली कार्पोव्ह यांचा जन्म.
१९६५ : वूर्केरी रामन, भारतीय क्रिकेट खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५७ : ऑगस्टिन लुई कॉशि, फ्रेंच गणितज्ञ. (जन्म: २१ ऑगस्ट १७८९)
१९०६ : नॉर्वेजियन नाटककार, दिग्दर्शक आणि कवी हेन्रिक इब्सेन यांचे निधन. (जन्म: २० मार्च १८२८)
१९३० : प्रख्यात भारतीय पुरातत्व व संग्रहालय तज्ञ तसचं, बनारस हिंदू विद्यापीठातील प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृतीचे प्राध्यापक राखालदास बंडोपाध्याय उर्फ जे. आर. डी. बनर्जी यांचे निधन.
१९३७ : रॉकफेलर घराण्यातील पहिले उद्योगपती, स्टँडर्ड ऑईल उद्योगसमूह व अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतील पहिल्या तेल उद्योगाचे संस्थापक जॉन डेव्हिसन रॉकफेलर यांचे निधन. (जन्म: ८ जुलै १८३९)
१९६० : निऑन लाईट चे निर्माते जॉर्ज क्लोडे यांचे निधन. (जन्म: २४ सप्टेंबर १८७०)
१९७५ : भारतीय सैन्यातील ले. जनरल व व्हिक्टोरिया क्रॉस मिळविणाअरे पहिले ले. जनरल पी. एस. बापट यांचे निधन.
१९३४ : क्लाईड बॅरो, अमेरिकन दरोडेखोर.
२०१० : भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक व भारतीय नक्षलवादी आंदोलनाचे जनक कानू सन्याल यांचे निधन.
२०१० : राष्ट्रीय पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय तेलगु भाषिक चित्रपट गायिका वेतुरी सुंदरम्मा मूर्ती यांचे निधन.
२०१४ : भारतीय क्रिकेटर माधव मंत्री यांचे निधन. (जन्म: १ सप्टेंबर १९२१)
२०१४ : भारतीय संगीतकार आणि दिग्दर्शक आनंद मोडक यांचे निधन. (जन्म: १३ मे १९५१)

# मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्त्यांमुळे गावपुढारी आणि अधिकारी समृद्ध

## शेतकऱ्यांची परवड सुरूच ;लोकसहभागातून रस्ते करण्याची नामुष्की

लिंबागणेश

राज्य शासनाने पालकमंत्री शेत रस्ते योजना २७ फेब्रुवारी २०१८ रोजी जाहीर केली. या योजनेचे महाविकास आघाडी सरकारने नामकरण करून ''मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजना नामकरण केले.मात्र ग्रामीण भागातील पाणंद रस्त्याची अवकळा मिटायला तयार नाही. शेतमाल बाजारात पोहचवण्यासाठी व शेतीमधील कमी होणारी मनुष्यबळाची उपलब्धता लक्षात घेता शेतीची कामे करताना यंत्राचा उपयोग वाढला आहे. यंत्रसामग्री शेतीपर्यंत जाण्यासाठी शेतीला बारमाही शेतरस्त्यांची गरज आहे.शेतरस्ते हे रस्ते योजनांमध्ये येत नसल्याने विविध स्त्रोतामधुन निधीच्या उपलब्धतेबाबत अडचणी निर्माण होतात.पावसाळ्यात शेतीमध्ये आंतरमशागत, पेरणी, मळणी,कापणी व इतर कामे यंत्रामार्फत केली जातात.या यंत्रसामुग्रीची वाहतूक करण्यासाठी पाणंद रस्ते सुयोग्य असणे गरजेचे आहे. शेतकरी आणि गावकरी समृद्ध व्हावा या उद्देशाने राज्यात ''मी समृद्ध तर गाव समृद्ध'' ही संकल्पना मग्रारोहयोतुन राबविण्यात



येत आहे.गाव समृद्ध करण्यासाठी शेतरस्त्यांचे महत्व शहरांना जोडणा-या महामार्गाएवढेच आहे. पाणंद रस्त्यांच्या अभावामुळे शेतमालाच्या वाहतुकीला मर्यादा येतात आणि त्यामुळे शेतकरी फायद्याचे पीकही घेत नाही. मात्र या योजनेमुळे बोगस कामे दाखवुन गावपुढारी आणि प्रशासकीय अधिकारी समृद्ध होताना दिसत आहेत.

मातोश्री शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत बीड जिल्ह्यात २४९६ रस्ते मंजूर केलेले असुन एकुण २८७५ किलोमीटर रस्त्याचे काम करण्यात येणार असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात येते.मात्र केंद्र सरकारच्या मोबाईल मॉनिटरिंग ॲप हजेरीमुळे मनरेगाच्या सार्वजनिक कामांसाठी दिवसातून दोनदा मजुरांचे फोटो काढावे लागत असल्याने कामावर मजुर दाखवणे अवघड झाले आहे.त्यामुळे मातोश्री शेत/पाणंद रस्त्यांची मंजुर कामे रखडलेल्या अवस्थेत आहेत. शेतवस्त्या आणि पाणंद रस्त्यांची जिल्ह्यात मोठी समस्या असुन सदरील कामे मातोश्री शेत/पाणंद योजनांमधून करण्यासाठी गावपुढा-यांनी रोहयो मंत्र्यापर्यंत ''वजन''वापरल्याची चर्चा आहे.परंतु आता मोबाईल मॉनिटरिंग ॲपमुळे मजुरांची हजेरी घेणे अवघड आहे.मंजुर रस्त्यांची कामे किचकट नियमांमुळे सुरू करता येत नसल्याने पावसाळ्यात गुडघ्याईतका चिखल तुडवत मुलांच्या शाळा, दवाखाना, बाजारहाट,दुधदुभती,बि -बियाणे , शेतीमाल आवक जावक करण्यासाठी वैतागलेल्या ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून रस्ता करण्याचे प्रकार सुरू असुन बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील वाणी वस्तीवरील ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून शेत/पाणंद रस्ता काम सुरू केले आहे.

लिंबागणेश येथील १५० लोकसंख्या असणाऱ्या वाणी वस्तीवर ग्रामस्थांनी चिखलात फसुन लक्ष्मण वाणी यांच्या बैलाचा मृत्यू झाल्यानंतर गेल्या लोकवर्गणीतून रस्त्याचे काम सुरू करत अर्धा रस्ता केला असुन यावर्षी पावसाळ्यापुर्वी उर्वरित रस्त्यांचे काम सुरू केले आहे . शासनाच्या शेतक-यांप्रती संवेदनाहीन भुमिकेबद्दल सागरबाई वाणी,सुलभा वाणी, महावीर वाणी, वैजिनाथ वाणी, दादाराव वाणी यांनी तिव्र नापसंती व्यक्त केली आहे.

## थोडक्यात

### यश कांबळे याचे बारावीच्या परीक्षेत यश



बीड : बारावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये बीड जिल्ह्याने छत्रपती संभाजीनगर विभागात पहिला क्रमांक पटकावला आहे. बीड शहरातील एक होतकरू विद्यार्थी यश मधुकर कांबळे याने १२ वी च्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. यश हा गॅरेज वर काम करतो. त्याचे वडील मधुकर कांबळे हे मिस्त्री काम करतात. अशा हलाखीच्या परिस्थितीत त्याने आपले १२ वी चे शिक्षण पूर्ण केले. १२ वी म्हणलं की पालक आपल्या पाल्यांना हमखास टीवीशन लावतात. त्यांना शिक्षणासाठी महागडे साहित्य देतात. मात्र यश या सर्वपासून वंचित होता. त्याला गॅरेज वर जाऊन काम करणे अत्यंत गरजेचे होते. त्यामुळे त्याने कसलीही टीवीशन न लावता मिळेल त्यावेळेत अभ्यास केला व १२ वी च्या परीक्षेत ७७.१७% टक्के मिळवले. त्याच्या या यशात आई सुरेखा कांबळे यांचे विशेष परिश्रम राहिले आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे कौतुक होत आहे.

### अक्षता शेटे हीचे बारावी परिक्षेत यश



बीड : येथील अक्षता अक्षय शेटे हीने बारावी परिक्षेत यश मिळवले आहे. या परिक्षेत ९३.८३% मार्क्स मिळवून ती दयानंद कॉलेज, लातूर १२ वी सीए फ ाऊंडेशन बॅच मधून मेरिट मध्ये आली. बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष अशोक शेटे यांची ती नात असून रोटरी चे माजी अध्यक्ष व कर सल्लागार अक्षय शेटे यांची ती कन्या आहे. तिने आयसीएससी दहावी परीक्षेत देखील उत्तुंग यश मिळवले होते. तिने लातूर येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालय मध्ये वाणिज्य सीए फ ाऊंडेशन बॅच येथे प्रवेश घेऊन हे यश मिळवले. तिला भविष्यात सीए व्हायचे आहे. त्या साठी तिने दहावी पासूनच याची तयारी सुरू केली आहे.तिच्या या यशाबद्दल दयानंद कॉलेज, लातूर चे ट्रस्टी संजय बोरा, प्राचार्य सौ.अंजली बुरांडे, सर्व प्राध्यापक तसेच सर्व मित्र मंडळी कडून तिचे व शेटे परिवाराचे अभिनंदन होत आहे.

### प्रेमदीप शिरसाट याचे बारावीच्या परीक्षेत यश



वडवणीः फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या बारावी बोर्डाच्या परीक्षेचा निकाल २१ मे रोजी बोर्डाच्या वतीने ऑनलाइन जाहीर करण्यात आला आहे या निकालामध्ये वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथील अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी प्रेमदीप दिलीप शिरसाठ यांने नुकत्याच झालेल्या बारावीच्या परीक्षेमध्ये घवघवीत हे संपादक करत विज्ञान शाखेत ७९.१७ टक्के घेत हे यश मिळवले आहे. तसेच प्रेमदीप शिरसाट याने गणित विषयात १०० पैकी ९४ मार्क आणि बायोलॉजी या विषयात ८९ मार्क घेतले आहेत या त्याच्या यशाबद्दल त्याचे शिक्षण नेमाटे सर यांनी अभिनंदन केले तसेच आई वडील दिलीप शिरसाठ प्रज्ञा शिरसाठ, मामा शिक्षक बाबासाहेब डावरे सर तक्षशिला डावरे अश्विनकुमार डावरे रसिका डावरे पूजा डावरे सायली डावरे , शिक्षक अंन्साराम डोंगरदिवे सर अमोल भडके नातेवाईक आणि मित्र परिवारा कडून प्रेमदीप शिरसाट याचे अभिनंदन केले.

## महाराणी ताराबाई विद्यालयाची निकालाची परंपरा कायम



वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांनी फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या बारावी परीक्षाचा निकाल मंगळवार दि.२१ मे २०२४ रोजी मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला यामध्ये वडवणी शहरातील शैक्षणिक क्षेत्रात नामांकित असलेल्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता बारावी विज्ञान शाखेचा १००% तर कला शाखेचा ९७.६१ % तर एकूण विद्यालयाचा ९९.११% निकाल लागला आहे विद्यालयाने उज्वल यशाच्या निकालाची परंपरा कायम ठेवली आहे विज्ञान शाखेतून कु.भाग्यश्री बापूराव मुंडे ८७.८३ % गुण घेऊन प्रथम क्रमांक आला आहे तर ८५.१७ % गुण घेऊन कु.अंजली आसाराम मस्के द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे तर चि.अभिषेक अशोक आंधळे यांना ८३.८३% गुण घेऊन तृतीय क्रमांक आला आहे

कला शाखेतून कुमारी अलका संजय गांधले हिने ८५.५०% गुण घेऊन प्रथम क्रमांक आला आहे तर कु.प्रतीक्षा भागवत मुंडे हिने ८४.१७% गुण घेऊन द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे तर कु.काजल बिभीषण लोंढे हीने ८०.१७% गुण घेऊन तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे . या यशाबद्दल संस्कार शिक्षण मंडळाचे सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तसेच विद्यालयाच्या शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजय भाऊ आंधळे, वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रंजीत भैय्या धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे व विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी. उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांचे पालक आणि मार्गदर्शक व अध्यापन करणारे विद्यालयाचे एचएससी बोर्ड परीक्षेचे केंद्र संचालक प्रा.कांबळे, प्रा.मुंडे सी.व्ही., प्रा.अंडील , प्रा.डाके , केदार , प्रा.राठोड, प्रा.मुंडे बी.डी., प्राध्यापिका कचरे , प्राध्यापिका उघडे,सावंत यांनी सर्वांचे हार्दिक अभिनंदन करून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## बुखारी ऊर्दु उच्च माध्यमिक विद्यालयाची उत्कृष्ठ निकालाची परंपरा कायम





माजलगांव । प्रतिनिधी

येथील बुखारी ऊर्दु उच्च माध्यमिक विद्यालयाने उत्कृष्ठ निकालाची यशस्वी परंपरा कायम राखत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा फेब्रुवारी २०२४ मध्ये परिक्षा मंडळा मार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये विज्ञान शाखेतुन प्रथम क्रमांकावर शेख तहुरा अय्युब याला ८२.६७% टक्के द्वितीय क्र. शेख मुसकान अख्तर ७६.००% टक्के तृतीय क्र. पठाण अक्सा समिउल्लाह याला ७५.१७% टक्के गुण मिळाले असुन तर कला शाखेतुन प्रथम क्रमांकावर शेख तंजिला मुनव्वर याला ८१.८३% टक्के, द्वितीय क्र. मनियार अरफिया आसेफ याला ७१.६७% टक्के तसेच तृतीय क्रमांकावर पठाण आयशा फेरोज याला ६६.३३% टक्के गुण प्राप्त झाले असुन या सर्व उत्तीर्ण विद्यार्थीनींचे बुखारी ऊर्दु एज्युकेशनल संस्थेचे सचिव खुर्शिद नाईक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य शेख हारुन बशिरोद्दिन, स.शि. देशमुख युसुफ , शेख फरहीन तबस्सुम, अब्दुल गणी सर, शेख अजहर, शाहीस्ता बाजी, यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थीनींचे अभिनंदन केले व पुढील वाटचालिस शुभेच्छा दिल्या.

## गांजा लावायला परवानगी द्या-भाई ॲड.गोले

माजलगाव । प्रतिनिधी

देशात शेतकऱ्याच्या आत्महत्येचा आकडा दिवशे-दिवस वाढत असून शेती म्हणजे आतबट्ट्याचा धंदा झाला आहे, त्यामुळे शेतीकडे नवीन पिढी दुर्लक्ष करताना दिसत आहे. असे असले तरी शासन तरुणांना रोजगार देण्यास असमर्थ ठरल्यामुळे व प्रचंड बेरोजगारी वाढल्यामुळे आज शेतकऱ्याच्या मुलांना शेती शिवाय पर्याय राहिलेला नाही, कृषीप्रधान देशात गेल्या दहा वर्षात हजारो शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत पण शेतकरी आत्महत्या वर तोडगा काढण्याचा शासनाने कधीही प्रयत्न केलेला नाही शिवाय शेतकरी आत्महत्येची कारणे



समजून देखील शेतकऱ्याच्या शेतमालाच्या हमीभावाचा प्रश्न कायम दुर्लक्षित आहे.

एकीकडे गेल्या दहा वर्षात शेतकऱ्यांच्या शेतमालाचा कुठलाही दर वाढलेला नाही परंतु गेल्या दहा वर्षात खताच्या किमतीत प्रचंड वाढ झालेली आहे, शिवाय बी-बियाणे, औषधे यांच्या किमतीत देखील प्रचंड वाढ झालेली असल्याने उत्पादन खर्च दुप्पट झाल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून शासनाला शेतकरी उध्वस्त करायचा आहे काय.? असा उद्विग्न सवाल विचारत शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांना दि. २१ मे रोजी निवेदनाद्वारे खताच्या किमती कमी करण्याची मागणी केली असून जर शेतकऱ्याच्या शेतमालाचा भाव वाढवणे शासनाला शक्य नसेल आणि खताच्या किमती नियंत्रणात ठेवले अशक्य असेल तर शेतकऱ्याला गांजा लावायला परवानगी देण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई ॲड.नारायण गोले यांच्यासह भाई मुंजा पांचाळ, राहुल सोळंके, विष्णू शेळके, सतीश शेजुळ, अशोक कुलकर्णी, परमेश्वर डाके, साळुजी हांडे, सुदाम चव्हाण आदींनी केली आहे.

## सावरकर यांच्या जयंतीनिमित्त अंबाजोगाईत ग्रंथ प्रकाशन सोहळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वातंत्र्यवीर वीर दामोदर सावरकर यांच्या १४१ व्या जयंतीनिमित्त २८ मे रोजी ज्येष्ठ पत्रकार-लेखक प्रवीण सरदेशमुख यांच्या '' स्वातंत्र्याचा दुसरा लढा'' या ग्रंथांच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. येथील अनिकेत मंगल कार्यालयात २८ मे रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. शरद हेबाळकर हे असणार असून छत्रपती संभाजी नगर येथील उद्योगपती आबासाहेब (सुधीर) देशपांडे यांचे हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचीव माधवराव पाटील, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचीव कमलाकर चौसाळकर, डॉ. दिलीप खेडगीकर हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास इतिहास व वाचन प्रेमी रसिकांना उपस्थित रहावे असे आवाहन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. बी. आय. खडकभावी, दिनदयाळ बँकेचे अध्यक्ष मकरंद पत्की,किशोर गिरवलकर, सेवानिवृत्त अभियंता संजय देशपांडे, डॉ. श्रीकांत बुट्टे, प्रा. अजय चौधरी, डॉ. अतुल देशपांडे यांनी केले आहे.

## शहर व परिसरात विजेचा लपंडाव, अघोषित लोडशेडिंग, नागरिक हैराण

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून शहर व परिसरात विज वितरण कंपनीच्या वतीने सातत्याने दिवसभरात अघोषित लोडशेडिंग होत असून भर उन्हाळ्यात नागरिक घामाने लाहीलाही होत आहेत. यामुळे नागरीकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.शहर व परिसरातील विज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी नागरीकांनी केली आहे.

माजलगाव शहरात विज वितरण कंपनीच्या वतीने विजपुरवठा केला जातो. येथील विज वितरण कंपनी सातत्याने चर्चेचा विषय असून कारभाराचा भोंगळपणा अनेकवेळा उघडकीस आला आहे.शहरात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने विज गूल होत आहे. विज वितरणाची समस्या निर्माण झाली असेल तर एक दोन दिवसात दुरुस्त करता येते. मग सतत पंधरा दिवसांपासून दिवसभरात दर तासाला विज गायब होत आहे. याकडे दुर्लक्ष कशामुळे होत आहे. का शहरात अघोषित लोडशेडिंग सुरु करण्यात आली आहे. अशी चर्चा शहरातील नागरीकांमध्ये सुरु आहे. दरम्यान येथील विजवितरण कंपनीचे कार्यालय सतत चर्चेत असते. कारण अगोदर विज ग्राहक जास्तीचे विज बील आल्याने त्रस्त झाले आहेत. शहरातील ग्राहकांच्या स्थानिक विज वितरणच्या कार्यालया यासंदर्भात अनेक तक्रारी आहेत. मात्र सहा, सहा महिने झाले तरी या तक्रारीचे निर्सन केले जात नाही. ग्राहक विज वितरण कंपनीच्या कार्यालयात चकरा मारुन बेजार होत आहेत. मात्र अधिकारी, कर्मचारी काही भेटत नाहीत. भेटले तर प्रोसिजर सुरू आहे. वेळ लागेल अशी उत्तरे दिली जातात. यामुळे ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. कोणत्याही तक्रारीचे निरसन एखाद्या महिन्यात होणे अपेक्षित आहे. कारण ग्राहकांचा जेवढा जास्त वेळ जाईल तेवढे या विज वितरण कंपनी व्याज लावत असते. यामुळे अगोदरच जास्तीचे बील आणि वेळ गेल्याने व्याजाचा भूर्दंड ग्राहकांना बसत आहे. याला जबाबदार कोण ? असाही प्रश्न निर्माण झाला आहे.म्हणून येथील स्थानिक कार्यालयाच्या कारभाराकडे वरिष्ठांनी लक्ष घालण्याची मागणी ग्राहकांनी केली आहे. पावसाळा असो अथवा नसो तसेच रात्री - बेरात्री कधीही विज गायब होत आहे. यामुळे सतत गूल होणारी विज सुरळीत करण्याचीही मागणी ग्राहक करत आहेत.

## पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती

### नागरीक करावा लागतो टंचाईचा सामना

अंबाजोगाई। प्रतिनिधी

मांजरा धरणातून लातूर-बीड-धाराशिव या जिल्ह्याची तहान भागविली जाते हे धरण सध्या मृत साठ्यात असले तरी या धरणातून अंबाजोगाई शहराला पंधरा दिवसाला पाणी पुरवठा होतो. साधारणत:आठवडाभर साठवण केलेले पाणी संपल्यानंतर शहर वासियांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते.

या पाणी टंचाईला सामोरे जात असताना शहरात असलेल्या विविध मंदिरातील भक्तांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तर अनुत्तरीतच आहे. या बरोबरच आद्यकवी मुकुंदराज परिसरातील वनखात्याच्या जंगलात वन्य प्राणी मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे त्यांच्यासाठी बनविलेले पाणवठे कोरडे पडले आहेत. माता योगेश्वरी देवी व मराठीचे आद्यकवी मुकुंदराज स्वामी समाधी,सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसरात तेथील विंधन विहिरीच्या आधारे भाविकांना पाण्याची सोय करण्यात आलेली आहे.परंतु खोलेश्वर मंदिर,बाराखांबी (सकलेश्वर)मंदिर व काशीचे उपस्थान असलेल्या काशी विश्वनाथ मंदिर परिसरात मात्र भाविकांसाठी पिण्याच्या पाण्यांची सोय झालेली नाही. मुकुंदराज परिसरात वनविभागाने पशु,पक्षी प्राण्यासाठी पाणवठे तयार केले शिवाय फेब्रुवारी-मार्च मध्ये या पाणवठ्यात टँकरद्वारे पाणी पुरवठा केला मात्र आता एप्रिल-मे महिन्यामध्ये पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असल्याने हे पाणवठे कोरडे पडले आहेत.

त्यामुळे वन्य प्राण्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. ज्या मंदीरात भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय नाही तेथे शासनाने पुढाकार घेऊन लोकसहभागातून भाविकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात यावी असे नागरिकांचे म्हणणे आहे.

## अंबाजोगाईत अनाधिकृत होर्डिंग लावणाऱ्याविरुध्द गुन्हे दाखल करा -आदमाने

### बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

नुकतीच होर्डिंग (बॅनर) कोसळून घाटकोपर, मुंबई येथे मोठी दुर्घटना घडली. यासारखी एखादी दुर्घटना अंबाजोगाई शहरात घडू नये, म्हणून अंबाजोगाईत अनाधिकृत व बेकायदेशीर होर्डिंग (बॅनर) लावणाऱ्या व्यक्तींविरूध्द फौजदारी गुन्हे दाखल करा अशी मागणी बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे प्रदेश सचिव ॲड.माणिक आदमाने आणि जिल्हाध्यक्ष शरद ओव्हाळ यांनी केली आहे. याप्रश्नी पक्षाच्या वतीने सोमवार, दिनांक २० मे रोजी मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबाजोगाई (जि.बीड) यांना निवेदन दिले आहे.



बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अंबाजोगाई शहरामध्ये स्वताःच्या मालकीच्या जागेवर तसेच शासकीय जागेवर अनाधिकृत व बेकायदेशीर होर्डिंग (बॅनर) लावण्यात आलेले असून काही होर्डिंग (बॅनर) तर अत्यंत धोकादायक जागेवर नियमबाह्य उभारण्यात आलेले आहेत.

त्यामुळे शासनाने ठरवून दिलेल्या नियमांचे उल्लंघन होत असून भविष्यात घाटकोपर, मुंबई सारखी एखादी मोठी दुर्घटना अंबाजोगाई शहरात ही होवू शकते. अशा दुर्घटना टाळण्याकरीता त्या होर्डिंग (बॅनर) चे ऑडीट होण्याची गरज आहे. तसेच जे होर्डिंग (बॅनर) बेकायदेशीर व अनाधिकृत लावण्यात आलेले आहेत. असे होर्डिंग (बॅनर) बेकायदेशीर व अनाधिकृत लावणाऱ्या व्यक्ती विरूध्द फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत अन्यथा बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने आपल्या कार्यालयासमोर तिव्र जनआंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देवून या निवेदनाची गांर्भीयपुर्वक दखल घ्यावी अशी विनंती ही करण्यात आली आहे. सदरील निवेदनावर बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे प्रदेश सचिव ॲड.माणिक आदमाने आणि जिल्हाध्यक्ष शरद ओव्हाळ यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# चांदापूरचा साठवण तलाव कोरडा!

## पाण्यासाठी माणसासह जनावरांचेही हाल

**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील शेकडो हेक्टर जमिनीसाठी वरदान ठरलेला चांदापूर येथील तलाव कोरडा पडला आहे. शेतकऱ्यांनी पाण्याचा बेसुमार उपसा केल्यामुळे हा तलाव कोरडा पडला असल्याची चर्चा होत असून सध्या पाण्यासाठी परिसरातील नागरिकांसह जनावरांचेही हाल होत आहेत. दरम्यान तलाव कोरडा पडल्यामुळे तलावातील काळी माती आपल्या शेतामध्ये टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गाळाचा उपसा करीत आहेत. यामुळे धरणामध्ये पाणी अधिक प्रमाणात साठण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. साठवण तलाव कोरडा पडल्याने बघ्याची गर्दी होत आहे तर अनेक नागरिक तलाव बांधणीच्या आठवणी जाग्या करताना आढळून येत आहेत.

चांदापूर हा परिसर पूर्णपणे डोंगराने वेढला असल्याने कायम रुक्ष वातावरण असायचे. या भागातील शेतकरी केवळ पावसाळी पिके आणि दुभते जनावरे सांभाळून उदरनिर्वाह करायची. मात्र सन १९७० च्या सुमारास या भागात चांदापूर तलाव पूर्ण झाला. कोरडवाहू शेतीसाठी प्रसिद्ध असलेल्या परळी तालुक्यामध्ये नागापूर येथील धरणानंतर चांदापूर येथे लघु साठवण तलाव बांधण्यात आला. सन १९६६ ते ६९ असा तीन वर्षाचा कालावधी हा तलाव पूर्ण होण्यासाठी लागला. १९७१ साली धरण ओव्हर फ्लो झाल्याचे प्रत्यक्षदर्शी काही जेष्ठ नागरिकांनी सांगितले. या साठवण तलावाची पाणी साठवण क्षमता ३.०१२ द.ल.घ.मी एवढी आहे. या तलावात जिवंत पाण्याचा साठा २.७३ दलघमी तर मृत पाण्याचा साठा ०.२४९ दलघमी एवढा आहे.



### माणसांसह पशुधनांचेही हाल

चांदापूर हे गाव परळी शहरासह अनेक ठिकाणी दूध पुरवठा करण्यासाठी प्रसिद्ध आहे. गाई आणि म्हशीचे प्रमाण येथे मोठ्या प्रमाणावर आहे. यावर्षी तलाव कोरडा पडल्यामुळे पशुपालकांचेही मोठ्या प्रमाणावर हाल होत आहेत. सध्या परिसरातील अनेक विहिरीचे पाणी ही तळ गाठू लागले आहे. त्यामुळे नागरिकांचे पाण्यासाठी हाल होत आहे. या तलावावर अवलंबून असलेल्या परिसरातील गावांमध्येही आता पाण्याची टंचाई भेडसावू लागली आहे.

### पाण्याच्या अति उपसामुळे तलाव पडला कोरडा

अनेक कोरडे दुष्काळ येऊन गेले मात्र चांदापूर साठवण तलाव कायम शेतकरी आणि नागरिकांना आधार दिला. या साठवण तलावातील पाणी परिसरातील अनेक गावांना पुरविण्यात येते. मात्र गेल्या काही वर्षापासून शेतकरी पाण्याचा अति उपसा करीत असल्यामुळे यावेळी तलाव कोरडा पडल्याचे काही शेतकऱ्यांनी सांगितले. शेतीला लागेल तेवढेच पाणी जर वापरले तर तलाव कधीच कोरडा पडत नाही हा इतिहास आहे मात्र गेल्या काही दिवसापासून शेतकरी पाण्याचा भरमसाठ उपसा करू लागल्याने पाणी कमी पडू लागले आहे. यावर्षी पाऊस चांगला झाला नाही हे लक्षात येऊनही शेतकऱ्यांनी काळजी घेतली नाही आणि त्याचाच परिणाम म्हणून तलाव कोरडा पडला.

### गाळ उपशामुळे साठवण क्षमता वाढण्यास मदत

चांदापूर साठवण तलाव पूर्णपणे कोरडा पडला असून सध्या शेतकऱ्यांनी गाळ उचलण्यासाठी मोठी गर्दी केली आहे. सुमारे २५ टिप्पर आणि ५० ट्रॅक्टर च्या साह्याने शेतकरी मोठ्या प्रमाणावर गाळ उपसा करीत आहेत. तलावामध्ये सध्या जेसीबी,पोकलेन, टिप्पर आदीच्या साह्याने गाळ उपसा केला जात आहे. या भागामध्ये मुरमाड जमीन असल्याने तलाव कोरडा पडल्याचे शेतकऱ्यांच्या पथ्यावर पडले आहे. सध्या दिवस-रात्र गाळ उपसा सुरू असल्याचे चित्र बघावयास मिळत आहे. तलावाचे काम सुरू असतानाचे चित्र आणि आताचे चित्र सारखेच असल्याचे अनेक वयोवृद्ध सांगत आहेत. गाळाचा उपसा केला जात असल्याने तलावाची खोली मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या गाळामुळे परिसरातील सुमारे ३०० एकर जमीन सुपीक होणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

### चांदापूर तलावाने शेकडो एकर जमीन फुलली

चांदापूर आणि परिसरामध्ये डोंगर असल्याने पिकासाठी योग्य असलेली जमीन कमी आहे. त्यातही पाण्याची सोय नसल्याने केवळ पावसाळ्यातच पिके घेतली जात होती मात्र चांदापूर येथे साठवण तलाव झाल्याने या भागातील शेतकऱ्यांचे जीवनमान बदलून गेले. जमीन पाण्याखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना अनेक वर्षे वाट पाहावी लागली. सन १९९० पासून शेतकरी जागरूक होऊन शेतीसाठी पाण्याचा वापर करू लागले आणि त्यामुळे या भागांमध्ये ऊस, भुईमूग आणि पालेभाज्या आधी पिके घेऊन बळीराजा समृद्ध होऊ लागला. त्यातच गो-पालन ही मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्याने दूध उत्पादनामुळे शेतकऱ्यांना बऱ्यापैकी पैसे मिळू लागले. चांदापूरचा साठवण तलाव या भागातील शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये आर्थिक क्रांती घडवणारा प्रकल्प ठरला.

## जवळगाव येथील बहुचर्चित जिलेटीन स्फोटातील मुख्य आरोपीला जामीन मंजूर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अनैतिक संबंधातून पान टपरीच्या खाली जिलेटीनच्या साह्याने स्फोट घडवून एकास जीवे मारण्याच्या प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथे घडली होती. या गंभीर प्रकरणातील मुख्य आरोपीला अंबाजोगाई सत्र न्यायालयाने मंगळवारी (दि.२१) जमीन मंजूर केला. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड.कमलकिशोर पारीख यांनी बाजू मांडली.





या प्रकरणाबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी अशोक भालेराव याची जवळगाव येथे पानटपरी आहे. नेहमी प्रमाणे अशोक ८ एप्रिल २०२४ रोजी दिवसभर त्याच्या पानटपरीवर बसून होता. रात्री ८.३० वाजताच्या सुमारास त्याच्या टपरीखाली मोठा आवाज झाला व टपरीखालील दगड उडून पत्र्यावर पडले. या स्फोटात अशोकला जबर दुखापत झाली. त्यानंतर गावातील लोक गोळा झाले व फिर्यादी अशोकला बाहेर काढले. त्यानंतर आजुबाजुला पहिले असता टपरी खालुन एक वायर लांब शेतात गेले आहे असे दिसले. त्यानंतर अशोकने बर्दापूर ठाण्यात जाऊन फिर्याद दिली. त्यावरून अज्ञात व्यक्ती विरोधात गु र क्र ८४/२४ कलम ३२४,४२७ व ३,४ स्फोटक पदार्थ असा गुन्हा दाखल झाला. स्फोटाच्या घटनेमुळे पोलिसांनी घटना अतिशय गांभीर्याने घेतली. विविध ठिकाणाहून तपास यंत्रणा जवळगाव मध्ये दाखल झाल्या होत्या. पोलिसांनी अधिक तपास केला असता अनैतिक संबंधामधून सदरचा प्रकार झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर सदर गुन्ह्यात एकूण चार आरोपी अटक करण्यात आले. त्यापैकी मुख्य आरोपी शेख चांद शेख बक्षु याला पोलिसांनी अटक केली व अधिकचा तपास करून दाखल गुन्ह्यात ३०७ कलम वाढवण्यात आले. त्यानंतर सदर मुख्य आरोपीची जामीनअर्ज दाखल केला असता न्यायालयाकडून फेटाळण्यात आला. त्यानंतर सदर आरोपीचे नातेवाईक ॲड. कमलकिशोर पारीख यांच्याकडे आले असता त्यांनी मुख्य आरोपीची जामीन दाखल केली. ॲड. पारीख यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून जिल्हा व सत्र न्या. घरत मॅडम यांनी कलम ३०७, ४२७, ३२४ व ३आणी ४ स्फोटक पदार्थ या कालमातून आरोपीला जामीन मंजूर केली. सदर प्रकरणात मुख्य आरोपीकडून ॲड. कमलकिशोर पारीख यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. अक्षय कामळे व ॲड. सुरेखा शिंदे यांनी सहकार्य केले.

## पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मांजरा धरणातून लातूर-बीड-धाराशिव या जिल्ह्याची तहान भागविली जाते हे धरण सध्या मृत साठ्यात असले तरी या धरणातून अंबाजोगाई शहराला पंधरा दिवसाला पाणी पुरवठा होतो. साधारणत:आठवडाभर साठवण केलेले पाणी संपल्यानंतर शहर वासियांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते.

या पाणी टंचाईला सामोरे जात असताना शहरात असलेल्या विविध मंदिरातील भक्तांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तर अनुत्तरीतच आहे. या बरोबरच आद्यकवी मुकुंदराज परिसरातील वनखात्याच्या



### नागरीक करतात पाणी टंचाईचा सामना

जंगलात वन्य प्राणी मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे त्यांच्यासाठी बनविलेले पाणवठे कोरडे पडले आहेत. माता योगेश्वरी देवी व मराठीचे आद्यकवी मुकुंदराज स्वामी समाधी,सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसरात तेथील विंधन विहिरीच्या आधारे भाविकांना पाण्याची सोय करण्यात आलेली आहे.परंतु खोलेश्वर मंदिर,बाराखांबी (सकलेश्वर)मंदिर व काशीचे उपस्थान असलेल्या काशी विश्वनाथ मंदिर परिसरात मात्र भाविकांसाठी पिण्याच्या पाण्यांची सोय झालेली नाही.

मुकुंदराज परिसरात वनविभागाने पशु,पक्षी प्राण्यासाठी पाणवठे तयार केले शिवाय फेब्रुवारी-मार्च मध्ये या पाणवठ्यात टँकरद्वारे पाणी पुरवठा केला मात्र आता एप्रिल-मे महिन्यामध्ये पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असल्याने हे पाणवठे कोरडे पडले आहेत. त्यामुळे वन्य प्राण्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. ज्या मंदीरात भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय नाही तेथे शासनाने पुढाकार घेऊन लोकसहभागातून भाविकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात यावी असे नागरिकांचे म्हणणे आहे.

## सिंदफणा विद्यालयाची उज्वल निकालाची परंपरा कायम

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यात शिक्षण क्षेत्रामध्ये अग्रेसर असणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने यावर्षीही इयत्ता बारावी च्या निकालात बाजी मारली असून उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे

सविस्तर वृत्त असे की वडवणी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हे उत्तम दर्जाचे शिक्षण देण्यासाठी वडवणी तालुक्यात प्रसिद्ध आहे यावर्षी सुद्धा मागील वर्षाप्रमाणे एच एस सी बोर्ड परीक्षेत भरघोस गुण मिळवून विद्यालयाच्या उज्वल निकालाची परंपरा कायम राखण्यात यशस्वी झाले आहेत विद्यालयातून लांडे अर्पिता सुधाकर या विद्यार्थिनीने ८७% गुन मिळवून विद्यालयातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे तर कला शाखेतून राठोड संगीता या विद्यार्थिनीने ७५ टक्के गुन्? मिळवून कला शाखेतून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे शिंदे साक्षी ८५%, द्वितीय, पवार श्रेया ८४.३३ तृतीय आणि ◀◀ पान ३ वर



बीड : मुख्यमंत्री आरोग्य सहाय्यता निधी विभागाचे सहाय्यक रामहरी राऊत यांनी बीड येथील शासकीय रुग्णालयाला भेट दिली .यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ.संजय राऊत, आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचे स्वीयसहाय्यक उदय पाटील, डॉ. पारखे आदींनी त्यांचा सत्कार केला.

## स्वाती मालीवाल प्रकरणात केजरीवाल गप्प का?

### गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांचा सवाल

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

स्वाती मालीवाल प्रकरणाला नऊ दिवस लोटूनही अरविंद केजरीवाल गप्प का, असा सवाल गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केला. आम आदमी पक्ष आता महिला व दिल्लीविरोधी पक्ष बनला असल्याची टीकाही त्यांनी केली. दिल्लीत लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी आले असताना भाजप मुख्यालयात आयोजित पत्रकारपरिषदेत ते बोलत होते.



सावंत म्हणाले की, स्वाती मालीवाल प्रकरणाला ९ दिवस लोटूनही केजरीवाल गप्प आहेत. मुख्यमंत्र्यांच्या १२० कोटींच्या महालात त्यांच्या २० वर्ष जुन्या महिला सहकाऱ्याशी गैरवर्तन करून मारहाण केली जाते. मात्र, तरीही मुख्यमंत्री गप्प बसतात, हा अत्यंत निर्लज्जपणा आहे. एकीकडे स्वाती मालीवाल मारहाणप्रकरणी विभवकुमार यांच्यावर कारवाई करण्याचे आश्वासन आपचे खासदार संजय सिंह देतात तर, दुसरीकडे अरविंद केजरीवाल विभवकुमारला आपल्या गाडीत बसवून लखनौला घेऊन जातात, यातून काय सिद्ध होते, असा सवालही त्यांनी केला. घटना घडल्यानंतर विभव कुमारला मुख्यमंत्र्यांच्या घरीच लपवून दिल्ली पोलिसांना तपासासाठी घटनेचे योग्य सीसीटीव्ही फुटेज मिळू दिले नसल्याचा आरोप सावंत यांनी केला.

## औरंगाबादमध्ये महावितरणच्या स्मार्ट मीटर बसवण्यावर वंचित बहुजन आघाडीचा विरोध

**बीड । प्रतिनिधी**

देशात पुढील वर्षभरामध्ये जवळपास २५ कोटी स्मार्ट मीटर बसविण्याचा सरकारचा मानस आहे. सदरील स्मार्ट मीटरला गुजरात, उत्तर प्रदेश व दिल्ली या ठिकाणी तीव्र विरोध करण्यात आलाय.

हे स्मार्ट मीटर बसविल्यानंतर मोबाईलला ज्या पद्धतीने प्रीपेड म्हणजेच अगोदर पैसे भरून नंतर वापर करण्यात येतो, त्याच पद्धतीने स्मार्ट मीटरसाठी अगोदर पैसे भरावे लागतात, त्यानंतर विद्युत वापर करण्यात येतो. वरील तीन राज्यांमध्ये स्मार्ट मीटर माध्यमातून विजेच्या वापरामध्ये व अगोदरच्या मीटरच्या बिलामध्ये दुपटीचा फरक आढळलेला आहे. तेथील स्थानिकांनी मीटर सोबत



महावितरणाचे कार्यालय सुद्धा फोडलेले आहेत. गुजरात, उत्तर प्रदेश व दिल्ली येथे नागरिकांची मनस्थितीचा अंदाजा घेत तेथील मीटर बसवण्याची प्रक्रिया थंडावली आहे व थेट औरंगाबाद जिल्ह्यामध्ये स्मार्ट मीटर बसविण्यासाठी योजना सरकारने आखली आहे.

स्मार्ट मीटरची चाचणी करून सर्वर इन्स्टॉलेशनबाबत चाचणी सुरू आहे त्यानंतर पुढच्या महिन्यापासून औरंगाबाद जिल्ह्यात मीटर बसवण्याची सुरुवात करू अशी माहिती महावितरणाचे अधीक्षक अभियंता शांतीलाल चौधरी यांनी दिली आहे. स्मार्ट मीटर ◀◀ पान ३ वर

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते इक्बाल अहमद सारदगी यांचे निधन

**कलबुर्गी । वृत्तसेवा**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार इक्बाल अहमद सारदगी यांचे बुधवारी (दि.२२) पहाटे कलबुर्गी येथील एका खासगी रुग्णालयात निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. कलबुर्गी लोकसभा मतदारसंघाचे त्यांनी दोन वेळा प्रतिनिधित्व केले होते.



गुलबर्गा येथे ५ जून १९४४ रोजी इक्बाल अहमद सारदगी यांचा जन्म झाला. सारदगी यांनी गुलबर्गा येथील कला आणि विज्ञान महाविद्यालयातून कला शाखेची पदवी, तर हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली होती. १९९९ मध्ये सारदगी त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे बसवराज पाटील सेदाम यांचा ६९ हजार मतांच्या फरकाने पराभव करून पहिल्यांदा ते लोकसभेत गेले होते. २००४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी पुन्हा पाटील सेदाम यांचा पराभव करून सलग दुसऱ्यांदा लोकसभेत कलबुर्गीचे प्रतिनिधित्व केले. २००८ मध्ये मतदारसंघांच्या परिसीमनानंतर मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव झाला, तेव्हा मल्लिकार्जुन खरगे यांना सारदगी यांची जागा मिळाली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजप उमेदवार उमेश जाधव यांच्याकडून पराभूत होण्यापूर्वी खरगे यांनी सलग दोन वेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले.

## सरकारने आता दुष्काळाकडे लक्ष द्यावे-नाना पटोले यांची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

संपूर्ण राज्य दुष्काळाने होरपळत आहे. बहुतांश भाग भीषण टंचाईचा सामना करत आहे. अशा संकटात राज्य सापडले असून, लोकसभा निवडणुका संपल्या आहेत. आता राज्य सरकारने दुष्काळाकडे गांभिर्याने लक्ष दिले पाहिजे. धरणातील पाणीसाठा जेमतेम असून हजारो गावांना, वाड्या वस्त्यांना पिण्याचे पाणी मिळत नाही. पाणी टंचाई असलेल्या प्रत्येक गावखेड्यात पिण्याचे पाणी मिळावे तसेच जनावरांना चारा उपलब्ध झाला पाहिजे. यासाठी आचारसंहिता शिथिल करुन तातडीने पिण्याचे पाणी व जनावरांना चारा मिळेल यासाठी सरकारने निर्णय घ्यावेत, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, राज्याच्या ग्रामीण भागात हंडाभर पाण्यासाठी माता भगिनी भर उन्हात वणवण करत आहेत, जनावरांना चारा



नाही, अनेक शहरात दहा बारा दिवसातून एकदा पाणी येते. राज्यातील २३ जिल्ह्यात पाण्याची भीषण टंचाई असल्याचे समजते, मराठवाड्यातील परिस्थिती तर अत्यंत गंभीर आहे. चारा नसल्याने दुध उत्पादक शेतकऱ्यासमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. राज्याला मोठ्या दुष्काळाचा सामना करावा लागत असून राज्य सरकारने उपाययोजना करण्यासाठी पावलं उचलावीत हे आम्ही चार महिन्यापूर्वी सांगितले होते पण राज्यातील भाजपा-शिंदे-अजित पवार यांचे सरकार आपसातील कुरघोड्या व दुसरे पक्ष फोडणे यातच व्यस्त असल्याने त्यांनी लक्ष दिले नाही. लोकसभा निवडणुकीमुळे शासन व प्रशासन निवडणुकीच्या कामात व्यस्त राहिले आता राज्यातील निवडणूक कार्यक्रम संपला आहे. राज्य सरकारने तातडीने पाणी व चाऱ्याची सोय करण्याकडे लक्ष दिले पाहिजे. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले की, राज्यात ४५ दिवस पुरेल एवढा चारा उपलब्ध असल्याचे पशुसंवर्धन आणि दुग्धविकासमंत्री राधाकृष्ण विखे पाटील सांगत आहेत. चारा उपलब्ध असेल तर मग चारा छावण्या सुरु करण्यासाठी महाभ्रष्टयुती सरकार कोणत्या मुहूर्ताची वाट पहात आहेत? राज्यात तातडीने चारा छावण्या सुरु केल्या पाहिजेत. अवकाळी पावसाच्या तडाख्याने आधीच शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे, त्यात आता दुष्काळाचे संकट ओढवले आहे. शेतकरी चारी बाजूनी संकटाने घेरला आहे, त्याला आधार देण्याची गरज आहे सरकारने तातडीने उपयायोजना कराव्यात, असे आवाहनही यावेळी केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
गुरुवार दि.२३ मे २०२४ । पान ७

# वेदांतचा जामीन रद्द, पण कोर्टाने त्याला प्रौढ म्हणून का घोषित केलं नाही?

## बाल हक्क न्यायालयाचं म्हणणं काय?



**पुणे । प्रतिनिधी**

बाल हक्क न्यायालयात बुधवारी पुण्याच्या हिट अँड रन प्रकरणावर सुनावणी पार पडली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आरोपी वेदांत अग्रवाल याचा जामीन रद्द केला. वेदांतला बालसुधारणगृहात ठेवण्याचा आदेश दिला. पण कोर्टाने वेदांतला प्रौढ म्हणून घोषित केलं नाही.

पुणे हिट अँड रन प्रकरणातील मुख्य आरोपी वेदांत अग्रवाल याचा जामीन रद्द करण्यात आला आहे. बाल हक्क न्यायालयात आज वेदांतचे वकील आणि पोलिसांच्या बाजूने जोरदार युक्तिवात करण्यात आला. या युक्तिवादानंतर बाल हक्क न्यायालयाने निकाल जाहीर केला आहे. बाल हक्क न्यायालयाने वेदांतचा जामीन रद्द करत त्याला बाल सुधारणगृहात ठेवण्याचा निर्णय दिला. त्याला आता निरीक्षणगृहात ठेवलं जाणार आहे. पण न्यायालयाने त्याला प्रौढ म्हणून घोषित केलं नाही. विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल घेतलेल्या पत्रकार परिषदेत वेदांतला प्रौढ म्हणून घोषित करुन कायदेशीर कडक कारवाई केली जाईल, अशी माहिती दिली होती. पण बाल हक्क न्यायालयाने वेदांतला आज प्रौढ म्हणून घोषित केलं नाही. न्यायालयाने यामागील तांत्रिक गोष्टी मांडल्या आहेत. वेदांत अग्रवाल याला प्रौढ म्हणून घोषित करण्यासाठी पोलिसांनी आज कोर्टात जोरदार युक्तिवाद केला. पोलिसांनी वेदांत कसा प्रौढ आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेदांत अग्रवालच्या केसची पार्श्वभूमी कोर्टात मांडल्यानंतर कोर्टाकडून वेदांतला प्रौढ म्हणून घोषित करण्यासाठी काही चाचण्या केल्या जाणार आहेत. वेदांतची शारीरिक परिस्थिती, त्याची मानसिकता आणि इतर गोष्टी विचारात घेऊन सबंधित चाचण्या केल्या जाणार आहेत. वेदांतला पुण्याच्या बाल हक्क न्यायालयाच्या बालसुधारगृहात ठेवले जाणार आहे.

# पाबळ येथील शेततळ्यात बुडून दोन भावांचा मृत्यू



**शिक्रापूर । प्रतिनिधी**

पाबळ (ता. शिरूर) येथे मामाच्या गावाला आलेल्या दोन शाळकरी सख्ख्या भावांचा शेततळ्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना आज (दि.२२) दुपारी साडेबाराच्या सुमारास घडली. आर्यन संतोष नवले (वय १३) व आयुष संतोष नवले (वय १०, दोघे, रा. राहू, ता. दौंड) अशी मृत्युमुखी पडलेल्या सख्ख्या भावांची नावे आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, मृत आर्यन व आयुष हे दोघे मंगळवारी (दि. २१) पाबळ येथील मामा सचिन भाऊसाहेब जाधव यांच्याकडे सुट्टी लागल्याने आले होते. आज दुपारी साडे बाराच्या सुमारास हे दोघे घराशेजारी असलेल्या भाऊसाहेब बापू जाधव यांच्या शेततळ्याजवळ खेळत खेळत गेले. दोघांनी कपडे काढून शेततळ्यात उडी मारली. परंतु, पोहता येत नसल्याने व पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही शेततळ्यात बुडाले.

शेजारीच शेळ्या चारत असलेले त्यांचे आजोबा बाळासाहेब जाधव यांनी घटना पाहिल्यावर मदतीसाठी आवाज दिला. कैलास आण्णाजी जाधव यांनी दोघांना पाण्या बाहेर काढले. परंतु, दवाखान्यात दाखल करण्यापूर्वीच दोघांचा मृत्यू झाला. ही घटना समजाताच पाबळ व राहू येथे शोककळा पसरली. पुढील तपास शिक्रापूर पोलीस करत आहे.

## पिण्याची मर्यादा ठरवा', पुणे न्यायालयाचे बार-पब मालकांना निर्देश

पुणे । प्रतिनिधी

पुणे येथे पोर्शे कार अपघात प्रकरणाने देश हादरला. ज्या पद्धतीने ही घटना घडली आणि नंतर अवघ्या काही तासांतच अल्पवयीन आरोपीला जामीन मिळाला, त्यावरुन देशभरात संतापाची लाट उसळली. पोलिसांच्या सुरुवातीच्या तपासाने तर लोकांच्या मनातील शंकेला अजून बळ दिले. आता पुण्यातील स्थानिक न्यायालयाने याप्रकरणात निर्देश दिले आहे. पब आणि बार मालकांनी ग्राहकांना दारु सर्व्ह करण्याची, मद्य देण्याची मर्यादा निश्चित करावी, कारण लोकांना दारु पिल्यानंतर वाहन चालवत घरी पण जायचे असते, असे न्यायालयाने म्हटले आहे.

न्यायाधीशांनी अपघातात दोन तरुणांच्या मृत्यूबद्दल चिंता व्यक्त केली. आरोपींना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. पी. पोक्षे यांच्यासमोर सरकारी पक्ष आणि आरोपींच्या वतीने युक्तीवाद करण्यात आला. न्यायाधीश पोक्षे यांनी सांगितले की, ज्या व्यक्तीने अधिक दारु पिली आहे, त्यांची पबमध्ये राहण्याची व्यवस्था व्हावी. रस्त्यावरील लोकांचा यात काय दोष? जे लोक पबमध्ये येतात. ते काही पायी घरी जात नाहीत. ते आपल्या वाहनातून घरी जातील. कुठे ना कुठे तरी बदल करावा लागेल. त्यामुळे पब आणि बार मालकांना त्यांना किती दारु द्यायची याची मर्यादा ठरवावी लागेल. न्यायालयाने बार आणि पब मालकांना लोकांना दारु सर्व्ह करण्याची मर्यादा ठरविण्यास सांगितल्याचे वृत्त समोर आले आहे.

# आरोपीच्या कुटुंबाचा अंडरवर्ल्डशी संबंध असेल तर चौकशी होणार

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कल्याणनगरमधील हिट ॲण्ड रन प्रकरणातील आरोपीच्या कुटुंबाचा अंडरवर्ल्डशी संबंध असेल तर त्याची संपूर्ण चौकशी केली जाईल. या प्रकरणात राजकारण करण्याचा प्रयत्न चुकीचा आहे. पोलिसांनी तत्परतेने कारवाई केली आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

बुधवारी माध्यमांशी बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या घटनेचे राजकारण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या घटनेत पोलिसांनी तत्काळ कारवाई केली. बाल न्याय मंडळाने दिलेल्या निर्णयावरही आम्ही आश्चर्य व्यक्त केले आहे, परंतु त्याविरोधात पोलिसांनी अपील दाखल केले आहे. अल्पवयीन मुलाला दारू देणाऱ्यांनाही अटक करण्यात आली असून गाडी देणाऱ्या वडिलांनाही अटक करण्यात आली आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी प्रत्येक गोष्टीत मतांचे राजकारण आणण्याचा केलेला प्रयत्न अत्यंत चुकीचा आहे. त्याचा निषेध करतो, असे फडणवीस म्हणाले.




पोलिसांचे अल्पवयीन आरोपीला समन्स

अपघात झाल्यानंतर नागरिकांनी चोप देत अल्पवयीन मुलाला पोलिसांच्या हवाली केले होते. याप्रकरणात मुलावर ३०४ ए नुसार व अन्य कलमानुसार गुन्हा दाखल झाला. त्याला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर न्यायालयाने त्याला काही अटी-शर्तींवर जामीन मंजूर केला होता. आता पुणे पोलिसांनी या अल्पवयीन आरोपीला समन्स बजावले असून त्याला बाल न्याय मंडळासमोर हजर राहण्यास सांगितले आहे.

नेमकी घटना काय?

ही कहानी आहे पुण्यातील एका बांधकाम व्यावसायिकाच्या मद्यधुंद रईसजाद्याने केलेल्या कृत्याची. वार शनिवार ठिकाण कल्याणीनगरचा परिसर! अनिस अवधिया मूळचा मध्यप्रदेशातील पालीचा, तर त्याची मैत्रीण अश्विनी कोस्टा ही देखील मध्यप्रदेशातील जबलपूरची. दोघेही पेशाने आयटी अभियंता. नोकरीच्या निमित्ताने त्यांचे पुण्यात वास्तव्य होते. मात्र, शनिवारची रात्र दोघांसाठीही काळ बनून आली. अनिस आणि मैत्रीण अश्विनी दोघे सॅटर्डेनाईट पार्टीसाठी एका हॉटेलमध्ये गेले होते. पार्टी संपल्यानंतर दोघे बाहेर पडले. साधारण मध्यरात्रीचे अडीच वाजले असतील. दोघे दुचाकीवरून घराच्या दिशेने निघाले होते. इतक्यात कल्याणीनगर जंक्शन चौकात एका भरधाव पोर्शे कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. अपघात एवढा भयानक होता की, अश्विनी हवेत उडून काही फूट फरफटत गेली. तिचा जागीच मृत्यू झाला, तर अनिस हा देखील गंभीर जखमी झाला होता. उपचारासाठी त्याला नजीकच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तेथे उपस्थित असलेले काही प्रत्यक्षदर्शी नागरिक या भयानक घटनेचे साक्षीदार आहेत. त्यांच्या निदर्शनास हा प्रकार येताच, त्यांनी तत्काळ अपघाताकडे धाव घेत तो रईसजादा आणि त्याच्या मित्रांना पकडून ठेवले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेली अश्विनी पाहताच त्यांना संताप अनावर झाला. त्यामुळे त्या बेवड्या रईसजाद्याला नागरिकांनी चोप दिला. तसेच त्याची गाडी दगडाने फोडली. पोलिसांना माहिती मिळताच, त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन त्या अल्पवयीन दारुड्या मुलाला ताब्यात घेतले.

# उजनी बोट दुर्घटनेत बुडालेल्यांच्या शोधमोहिमेत अपयश, एनडीआरएफचे पथक माघारी फिरले

**पुणे । प्रतिनिधी**

उजनी धरणाच्या जलाशयात बुडालेल्या बोटीच्या शोधकार्यात आज एनडीआरएफ ला दिवसभर कष्ट करूनही अपयश आल्याचं पाहायला मिळालं. मंगळवारी सायंकाळी झालेल्या दुर्घटनेत, धरणात बुडालेल्या एकही व्यक्तीचा शोध लागू शकला नाही. मंगळवारी सायंकाळी सहाच्या दरम्यान कुगावपासून कळाशीपर्यंत जलवाहतूक करणारी एक बोट बुडाल्याची भीषण दुर्घटना घडली. या बोटीतून ७ प्रवसी प्रवास करत होते, पण यातील पोलीस उपनिरीक्षक राहुल डोंगरे यांनी पोहोत पोहोत येऊन नदीपात्राचा किनारा गाठला. मात्र, या बोटीतील उर्वरीत ६ प्रवासी बुडाले आहेत. डोंगरे यांनीची या घटनेची माहिती ग्रामस्थ व प्रशासनाला दिली. त्यानंतर, सुरू झालेल्या शोधमोहिमेला बुधवारी दिवसभरात यश आलं नाही.



उजनी धरणातील बोट दुर्घटनेत करमाळा तालुक्यातील झरे येथील जाधव दाम्पत्य व त्यांची दोन लहान मुले, कुगाव येथील आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष धनंजय डोंगरे यांचा तरुण मुलगा आणि बोट चालक असे एकूण सहा जण बुडाले आहेत. स्थानिकांनी काल रात्रीच्या अंधारातही सर्वांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, केवळ महिलेची पर्स, मोबाईल आणि लहान मुलांच्या वस्तूच सापडल्या आहेत.

बोट दुर्घटनेतील ६ जणांच्या शोध कार्यासाठी छऊठऋ च्या टीमने आज सकाळपासूनच युद्धपातळीवर मोहीम हाती घेतली होती. मात्र, दिवसभर शोध घेऊन देखील त्यांना केवळ ३५ फूट खोल पाण्यात अडकून बसलेली बोट सापडली. मात्र, बुडालेल्यांपैकी एकाचाही शोध लागला नाही. दरम्यान, आज सायंकाळी पाचच्या सुमारास पुन्हा एकदा जलाशयात वादळ वारे सुरू झाल्याने एनडीआरएफच्या पथकाला शोधकार्य थांबवावे लागले. दिवसभर जवळपास १२ तास छऊठऋ च्या टीम आणि स्थानिकांनी जलाशयात शोध घेतला. मात्र, आज एकाचाही शोध लावण्यात यश आले नाही. उद्या सकाळी पुन्हा लवकर शोधमोहिमेला सुरुवात होणार आहे. मात्र, या घटनेमुळे करमाळा तालुक्यात शोककळा पसरली आहे. तालुक्यातील प्रत्येकाचं लक्ष उजनी जलाशयातील या घटनेकडे लागले आहे. विशेष म्हणजे नेतेमंडळीही या शोधोमोहिमेत सहभागी झाल्याचं पाहायला मिळालं. बोट दुर्घटनेत बुडालेल्यांच्या आठवणीने नातेवाईक व्याकुळ झाले असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

खासदारही शोधमोहिमेत सहभागी

दरम्यान, सकाळपासूनच खासदार सुप्रिया सुळे आणि खासदार रणजित निंबाळकर यांनी घटनास्थळी भेट देऊन शोधकार्याची मोहिम हाती घेतल्याचंही दिसून आलं. मात्र, प्रयत्नांची पराकाष्टा करुनही आज दिवसभारत एकाचाही शोध न लागल्याने नातेवाईक आणि अत्पजनांचा धीर सुटत चालला आहे.

# अवकाळीने हरितगृहचालकांचे नुकसान

**दिवे । प्रतिनिधी**

मागील आठवडाभर अवकाळी पावसाने विविध भागांत जोरदार हजेरी लावल्याने सर्वांचीच त्रेधातिरपीट उडाली. दिवे परिसरातदेखील मागच्या दोन ते तीन दिवसांत वळवाने हजेरी लावली. या पावसाने हरितगृह चालकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



सध्या दिवे परिसरात दुष्काळी परिस्थिती असल्याने सर्वजणच वळवाच्या प्रतीक्षेत होते. मात्र, पाऊस कमी, वार्याचा वेग आणि विजांचा गडगडाट जास्त अशी स्थिती आहे. या पावसामुळे जमिनीच्या मशागतीच्या कामाला वेग येणार आहे. शिवाय मेढपाळांनादेखील दिलासा मिळाला आहे. मात्र, विहिरींच्या पाणी पातळीत किंचितदेखील वाढ झाली नाही. त्यामुळे अजून दमदार पावसाची गरज दिवे परिसराला आहे.

दुसरीकडे मात्र या पावसामुळे हरितगृह चालकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सचिन झेंडे, राहुल झेंडे, प्रमोद टिळेकर, विनोद टिळेकर या शेतकर्यांनी दुष्काळी परिस्थितीत अक्षरशः टँकरच्या पाण्यावर हरितगृहातील पिके जोपासली होती. परंतु वार्याच्या वेगाने हरितगृहावरील आच्छादन फाटल्याने या शेतकर्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. यावर्षी जेवढे उत्पादन मिळाले ते टँकरच्या पाण्यासाठी खर्च केले आणि आता अजून मोठा आर्थिक फटका बसल्याने या शेतकर्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे.

नुकसानीचे पंचनामे करा

अजूनही दोन-चार दिवस वळवाचा मुक्काम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला असल्याने हे शेतकरी भयभीत झाले आहेत. या नुकसानीचे पंचनामे करून शेतकर्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकर्यांनी केली आहे. एकीकडे वळवाच्या पावसाची शेतकरी आतुरतेने वाट पाहत आहेत, तर दुसरीकडे मात्र काही शेतकर्यांचे अक्षरशः होत्याचे नव्हते झाले आहे.

## दुर्दैवी! विजेच्या धक्क्याने युवती व महिलेचा मृत्यू

**तळेगाव ढमढेरे । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील पिंपळे जगताप व तळेगाव ढमढेरे या ठिकाणी युवतीसह महिलेचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. या दोघींच्या मृत्यूबाबत शिक्रापूर पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

आकांक्षा दीपक पवार (वय १८, रा. पिंपळे जगताप, ता. शिरूर) व आशा नवनाथ खलसे (वय ५२, रा. भैरवनाथ नगर, तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर) अशी मृत्यू झालेल्या दोघींची नावे आहेत. याप्रकरणी अनुक्रमे शिक्रापूर पोलिस ठाण्यात याबाबत दत्तात्रय ज्ञानेश्वर दौंडकर (वय ३०, रा. सांगवी सांडस, ता. हवेली) व सोमनाथ राम गायकवाड (वय ३१, रा. तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर) यांनी खबर दिली आहे.

आकांक्षा पवार ही घरामागील प्लॉटिंगजवळ गेली होती. तेथे विजेच्या तारेचा धक्का बसून आकांक्षाचा मृत्यू झाला. तर आशा खलसे या घराशेजारी काम करत असताना त्यांचा विजेच्या खांबाला हात लागल्याने धक्का बसून त्यांचा मृत्यू झाला.

# वाट दिसू दे गा देवा... उजनी दुर्घटना शोधमोहिमेत कट्टर विरोधकांची आपुलकी, खा. निंबाळकरांसाठी पुढे सरसावल्या सुप्रियाताई

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राची एक संस्कृती आहे, महाराष्ट्राची राजकीय परंपरा आहे, महाराष्ट्र इतर राज्यांपेक्षा वेगळा आहे, असं आपण नेहमीच ऐकतो. मात्र, गेल्या काही वर्षातील राजकारण पाहता महाराष्ट्राती राजकीय संस्कृती लयाला गेली आहे, राजकारणाचा चिखल झालाय, अशा संतप्त प्रतिक्रियाही उमटतात. मात्र, काही क्षण असे असतात जे पुन्हा एकदा महाराष्ट्राची संस्कृती आणि भानविकतेचं दर्शन घडवतात. उजनी जलाशयात ६ जण बुडाल्याची दुर्घटना मंगळवारी सायंकाळी घडली. या घटनेनंतर प्रशासन खडबडून जागे झालं आहे. तर, इंदापूर व करमाळा परिसराशी संबंधित ही घटना असल्याने या क्षेत्रातील दोन्ही खासदार (ाशालशी ष रिश्रळाशपीं) आज सकाळीच घटनास्थळी पोहोचले. उजनी धरणात बोट बुडाल्ची माहिती मिळताच स्थानिक आमदार दत्तात्रय भरणे यांनी रात्रीच घटनास्थळी धाव घेतली होती. त्यानंतर, आज सकाळपासून इतर राजकीय नेत्यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला.

अपघातस्थळाची जागा अतिसय अरुंद व आतमध्ये दूरपर्यंत असल्याने चिखलवाटेतून मार्ग काढत घटनास्थळापर्यंत पोहोचणे दिव्यच होते. तरी देखील बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे सकाळीच घटनास्थळावर दाखल झाल्या होत्या. तर, कळाशी येथे भेट देण्यासाठी माढा लोकसभेचे खासदार रणजीतसिंह निंबाळकर हे देखील निघाले होते. खासदार निंबाळकर यांनीही लाईफ सेव्हींग जॅकेट परिधान करुन बोटीने शोधमोहिमेत सहभाग घेतला होता. तत्पूर्वी घटनास्थळावर पोहोचण्यासाठी कसे जावे याची माहिती घेत पुढे जात असतानाच समोरच त्यांना खासदार सुप्रिया सुळे दिसल्या. त्यावेळी, सुप्रिया सुळे यांनीच खासदार निंबाळकर यांना संबंधित घटनेची इतंभू माहिती दिली. नेमकी घटना कशी घडली, इथपासून ते घटनास्थळावर कसे पोहोचायचे हेही सांगितले. एवढ्यावर न थांबता त्यांनी आपल्या सोबतच्या एका सहकाऱ्यास खा. निंबाळकर यांच्यासमवेत रस्ता दाखवण्यासाठी पाठवले होते. गेल्या महिनाभरात एकमेकांच्या विरोधात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी करणारे हे राजकीय विरोधक आज संवेदनशीलता जपत एकत्र आल्याचे पाहून ग्रामस्थांनाही बरे वाटले.




निवडणुकांत ऐकमेकांवर टीका

भाजप नेते आणि माढ्याचे खासदार रणजितसिंह निंबाळकर हे नेहमीच बारामतीवर सडकून टीका करताना दिसतात. राजकारणात सुरुवातीपासून त्यांनी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि अजित पवार यांना लक्ष्य केल्याचं पाहायला मिळालं आहे. मात्र, अजित पवार महायुतीत आल्यावर निंबाळकर यांच्या टीकेच्या धनी खासदार सुप्रिया सुळे ह्याच राहिल्या आहेत. तर, सुप्रिया सुळेंनी देखील रणजितसिंह निंबाळकर यांच्यावर निवडणूक काळात जोरदार टीका केल्याचं दिसून आलं. मात्र, अनावधानाने आज हे दोन्ही नेते समोरासमोर आले. त्यावेळी, या दोन्ही कट्टर विरोधी राजकारण्यांचे वैयक्तिक नातं हे किती दृढ आहे, याची प्रचिती उपस्थितांना आली.

दु:खत प्रसंगात जपली संवेदनशीलता

खासदार निंबाळकर यांना उजनी जलाशयातील अवघड रस्ता समजून ते लवकर घटनास्थळी पोहोचावेत, यासाठी सुळे यांनी मदत केली. यावेळी, दोघांमध्ये संबंधित घटनेवर प्रदीर्घ चर्चाही झाली. सुप्रिया सुळेंनी वाटेतील गाड्या बाजूला काढून त्यांना रस्ता द्यायला लावला, याशिवाय त्यांच्यासोबत आपला एक माणूस देऊन निंबाळकर याना घटनास्थळी पोहोचले. संवेदनशील घटनांमधून राजकीय नेत्यांचे असे वेगळे नातेही, या दु:खद प्रसंगातून जनतेसमोर आले. दरम्यान, सुप्रिया सुळेंनी केलेल्या मदतीसाठी खासदार निंबाळकर यांनीही हात जोडून त्यांचे आभार मानत मानले. राजकारणाचा चिखल झाल्याची टीका नेहमीच होत असते. मात्र, जनसेवेत आणि दु:खद प्रसंगात व्यक्तिगत हेवेदावे विसरुन झालेला हा एकोपा अनेकांच्या काळजात घर करुन गेला.